


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ३ रे | अंक : ३५६ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# हत्या नियोजनाच्या कटाचे सूत्रधार धनंजय मुंडे



मनोज जरांगे यांचा आरोप

**बीड : (समर्थ गांवकरी)**

मनोज जरांगे यांची हत्या करण्याचा कट रचणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या आरोपींमधील एकाने हत्येचा कट बीडच्या नेत्याने रचल्याची माहिती आपणास दिली, असा दावा मनोज जरांगे यांनी केला आहे.

वारंवार हे आरोपी धनंजय मुंडे यांच्या संपर्कात होते. थेट मारून टाकण्याऐवजी परराज्यातील गाडी क्रमांक मिळवून अपघात घडवून आणण्यापर्यंतची चर्चा झाली असल्याचा दावा जरांगे यांनी पत्रकार बैठकीत केला. मारण्याच्या कटाचा व्यवहार अडीच कोटी रुपयांचा होता, असेही जरांगे म्हणाले. दरम्यान, या प्रकरणात माझ्यासह सर्वांची नार्को चाचणी करून सीबीआय मार्फत तपास करावा, असे मत धनंजय मुंडे यांनी उत्तरादाखल आयोजित पत्रकार बैठकीत व्यक्त केले.

जालना पोलीस अधीक्षकांना मराठा आंदोलनातील कार्यकर्ते गंगाधर काळकुटे यांनी लिहिलेल्या तक्रारीत जरांगे पाटील यांच्या जीवे मारण्याची धमकी देऊन कट रचून देणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करावी, असे म्हटले होते. दादा गरुड आणि अमोल खुने अशी या दोन आरोपींची नावे काळकुटे यांनी पोलीस अधीक्षकांना लिहिलेल्या पत्रात दिली आहेत.

### माझ्यासह जरांगे व आरोपींचे ब्रेन मॅपिंग करा

जरांगे यांनी धनंजय मुंडे यांचे नाव घेतल्यानंतर मुंडे यांनीही पत्रकार बैठक घेऊन त्यास प्रतिउत्तर दिले. मुंडे म्हणाले, माझी आणि मनोज जरांगे यांच्यासह या प्रकरणातील आरोपींची ब्रेन मॅपिंग आणि नार्को चाचणी घ्यावी. हे तुम्हाला सगळं महागात पडेल, असा इशाराही मुंडे यांनी दिला.

## स्थलांतरित कामगार ठरणार एक्स फॅक्टर



बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचे मतदान पूर्ण झाले आहे. यानंतर राज्यात झालेल्या विक्रमी मतदानामागील कारणांची चर्चा सुरू आहे. निवडणूक रणनीतीकार राहिलेले आणि आता राजकारणात उतरलेले जन सूरज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी यामागची दोन कारणे सांगितली आहेत.

## आता बोला...




# जमीन खरेदीचा व्यवहार रद्द; पार्थ पवारप्रकरणी अजित पवारांची माघार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

पार्थ पवार भागीदार असलेल्या कंपनीच्या पुण्यातील जमीन खरेदी व्यवहारावरून मुख्यमंत्र्यांनी दिलेला चौकशीचा आदेश तसेच आरोपांची राळ उठल्यानंतर हा जमीन खरेदीचा व्यवहार रद्द करण्यात येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी केली. जमिनीच्या बेकायदा खरेदी- विक्री प्रकरणात पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करीत सर्व दस्तऐवज ताब्यात घेतल्याने अजित पवारांसाठी सूचक इशारा होता. अखेर करार रद्द करीत अजित पवारांना माघार घ्यावी लागली. सिंचन घोटाळ्यानंतर पवारांसाठी हा



मोठा धक्का मानला जातो. पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील ४० एकर जागा अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे भागीदार असलेल्या 'अमोडिया' कंपनीने खरेदी केली होती. ही जमीन महार वतनाची होती. महार वतनाची जमीन जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय विकता येत नाही. सरकारच्या ताब्यातील ही जमीन १९८८ मध्ये 'बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया' या केंद्र सरकारच्या संस्थेला भाडेकराराने देण्यात आली होती. कागदपत्रांवर ही जमीन राज्य शासनाच्या मालकीची आहे. या जमिनीवर खासगी माहिती तंत्रज्ञान पार्क उभारण्यात येणार असल्याचा दावा करून २१ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्कही माफ करण्यात आले होते.

बेकायदा जमीन खरेदी- विक्रीचा व्यवहार उघडकीस येताच अजित पवारांवर टीका सुरू झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचा आदेश दिला होता. त्यानंतर सारी सूत्रे हालली आणि पुणे पोलिसांनी चपळाईने कारवाई केली. अजित पवारांसाठी हा मोठा धक्का होता. मुख्यमंत्र्यांनी दिलेला चौकशीचा आदेश, विरोधकांकडून करण्यात येणारे आरोप यांमुळे अजित पवारांनी सपशेल माघार घेतली.

'सार्वजनिक जीवनात वावरताना मी काहीही चुकीचे केले नाही. यापूर्वी माझ्यावर असेच आरोप झाले. पण आरोप सिद्ध होऊ शकले नाही, असे अजित पवारांनी स्पष्ट केले. या व्यवहाराची मला काहीही माहिती नव्हती. सार्वजनिक जीवनात वावरताना आरोपांचा संशय आपल्यावर होऊ नये या उद्देशाने पार्थ यांच्या कंपनीने केलेला करार रद्द करण्यात येत असल्याची घोषणा अजित पवारांनी केली. विक्रीपत्र रद्द करण्यासाठी शुक्रवारीच आवश्यक दस्तऐवज नोंदणी कार्यालयात सादर करण्यात आल्याची माहिती अजित पवारांनी दिली. तसेच त्याची कागदपत्रेही माध्यमांना सादर करण्यात आली.

जमिनीचा प्राथमिक करार करण्यात आला होता. यात एक रुपयाचाही व्यवहार झालेला नाही. विक्रेत्यास कोणतेही पैसे देण्यात आलेले नाहीत. जमिनीचा ताबाही घेतलेला नाही. हा व्यवहार अपूर्ण अवस्थेत आहे, असेही अजित पवारांनी सांगितले.

अमेडिया कंपनीने केलेला व्यवहार रद्द करण्यासंदर्भात संबंधित पक्षकार नोंदणी आणि मुद्रांक विभागात दाखल झाले. मात्र जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्क आणि व्यवहार रद्द करायचा झाल्यास नियमानुसार आणखी तेवढीच रक्कम भरावी लागणार आहे. त्यानंतरच हा व्यवहार रद्द होणार आहे, असे मुद्रांक शुल्क विभागाने सांगितले.

> या संपूर्ण प्रकरणाची तपासणी करण्यासाठी सरकारने चौकशी समिती नेमली आहे. कोणाकडे काही ठोस माहिती किंवा पुरावे असल्यास त्यांनी ते समितीसमोर सादर करावेत. चौकशीतून सत्य उघडकीस येईल आणि कोणीही दोषी आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.
> **– अजित पवार, उपमुख्यमंत्री**

# आमदार संग्राम जगताप यांच्या अडचणी वाढणार!

**अकोला : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आमदार संग्राम जगताप यांच्या अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत. सोलापूरमध्ये १० ऑक्टोबर रोजी आयोजित हिंदू आक्रोश मोर्चाच्या सभेत त्यांनी दिवाळीची खरेदी हिंदुंच्या दुकानातूनच करण्याचे आवाहन केले होते. या प्रकरणात धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करून अकोल्यातील न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश संघटन सचिव जावेद जकरिया यांनी न्यायालयात धाव घेतली.

आमदार संग्राम जगताप यांनी दिवाळीच्या तोंडावर खरेदी केवळ हिंदूंच्या दुकानातूनच करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यात नव्या वादाला तोंड देखील फुटले होते. राष्ट्रवादी पक्षाने देखील त्यांच्या या वक्तव्यावर नाराजी व्यक्त करून काढणे दाखवा



### धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप

नोटीस बजावली. तरीही आमदार संग्राम जगताप आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. राष्ट्रवादी अजित पवार गटातच आमदारांमध्ये मते-मतांतरे दिसून आले. या प्रकरणात अनेक ठिकाणी निषेध करून पोलीस तक्रारी देखील दाखल झाल्या. आता हे प्रकरण थेट न्यायालयात पोहोचले आहे. एका विशिष्ट समाजाच्या भावनांना ठेस पोहोचवणारे, तसेच दोन वेगवेगळ्या जाती-धर्मांमध्ये फूट पाडून सामाजिक तणाव निर्माण करण्याच्या उद्देशाने बेजबाबदार व उत्तेजक विधान केल्याचा गंभीर आरोप आमदार संग्राम जगताप यांच्यावर करण्यात आला आहे. या प्रकरणाचा परिणाम अकोला शहर व जिल्ह्यातही दिसून आला. या संदर्भात जावेद जकरिया यांनी रामदासपेठ पोलीस ठाण्यात तसेच जिल्हा पोलीस प्रशासन आणि विधानसभा अध्यक्षांकडे लिखित तक्रार दाखल केली.

मात्र, संबंधित आमदार सत्ताधारी गटातील प्रभावशाली नेता असल्याने तक्रारीवर कोणतीही कारवाई न झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. जावेद जकरिया यांनी अकोल्यातील फौजदारी वकील अॅड. नजीब शेख यांच्या माध्यमातून अकोला न्यायालयात थेट फौजदारी खटला दाखल केला.

जकरिया यांनी त्यांच्या अर्जात आमदार संग्राम जगताप यांच्यावर भारतीय न्यायसंहिता अंतर्गत कलम १३६ (१) (अ) (ब)(क), कलम १३६ (२), कलम १९७ (अ) (ब) (क) (ड), कलम ३५६ (१) (२) (३) नुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात आता न्यायालयीन लढा दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा एकदा हा वाद उद्भवल्याने राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

## कोल्हापूरची प्रवेश कमान भुईसपाट

**कोल्हापूर : (समर्थ गांवकरी)**

पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरून कोल्हापुरात येत असताना तावडे हॉटेल थांब्याजवळील प्रवेश कमान ही कोल्हापूरची विशेष ओळख बनली होती. ती खराब झाल्याने काल रात्री ती भुईसपाट करण्यात आली. यामुळे करवीर नागरी प्रवेश करतानाची एक ओळख आता काळाच्या पडद्याआड गेली आहे. कोल्हापूर शहरात प्रवेश करण्यासाठी पूर्वेकडील पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग, दक्षिणेस कागल, शिवाजी विद्यापीठ मार्ग, कोकणाकडून रत्नागिरी, जोतिबा मार्ग, राधानगरी मार्ग असे काही प्रमुख मार्ग आहेत. यापैकी केवळ पुणे बेंगलोर मार्गावर तावडे हॉटेल परिसरातील मुख्य मार्गावर गेली २७ वर्षापूर्वी स्वागत कमान उभारण्यात आली होती. महानगर पालिकेत जनसंपर्क अधिकारी पदावरून स्वेच्छानिवृत्ती घेऊन मंडलिक यांनी स्वतःची जाहीरात कंपनी सुरु केली होती. या जाहीरात कंपनीमार्फत महापालिकेशी करार करून सर्व हक्क कंपनीकडे घेऊन ही स्वागत कमान उभी केली होती.

# 'वंदे मातरम्'ची कडवी गाळल्यावरून पंतप्रधान मोदींची टीका

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

'वंदे मातरम्'ची महत्त्वाची कडवी १९३७ मध्ये गाळली गेली होती, त्यामुळे देशात फाळणीची बीजे रोवली गेली, असा दावा करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी काँग्रेसवर टीका केली. अशा प्रकारची विभाजनवादी मानसिकता अजूनही देशासमोरील आव्हान आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

स्वातंत्र्यचळवळीत स्वातंत्र्य सैनिकांचे महत्त्वाचे स्फूर्तीगीत असलेल्या 'वंदे मातरम्'ला शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने दिल्लीतील 'इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम' मध्ये आयोजित कार्यक्रमामध्ये वर्षभराच्या सोहळ्याला सुरुवात झाली. त्याचे उद्घाटन केल्यानंतर पंतप्रधान मोदींनी काँग्रेसला लक्ष्य केले. या वेळी पंतप्रधान मोदी यांनी एका विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन केले. राष्ट्रउभारणी करणाऱ्या 'वंदे मातरम्'बरोबर अन्याय झाला आहे आणि आताच्या पिढीला हा अन्याय कळलाच पाहिजे, असे पंतप्रधान म्हणाले. त्यापूर्वी जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसने धर्मांध अजेंडा राबवल्याचा आरोप भाजपने केला.



> **'वंदे मातरम्' हे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा आवाज झाले होते, त्याद्वारे प्रत्येक भारतीयाच्या भावना व्यक्त झाल्या होत्या. दुर्दैवाने १९३७मध्ये 'वंदे मातरम्'ची महत्त्वाची कडवी गाळली गेली. त्याच्या ('वंदे मातरम्') आत्म्याचे अंशत: विच्छेदन केले गेले. 'वंदे मातरम्'च्या विभागणीमुळे फाळणीचीही बीजे रोवली गेली. – नरेंद्र मोदी, पंतप्रधान**







# बांगलादेशची 'तालिबान'कडे वाटचाल

## संपादकीय



अफगाणिस्तानमधील तालिबान आणि बांगलादेशमधील सरकार यांच्यात आता फारसा फरक राहिलेला नाही. त्यांच्यातलं अंतर आता हळूहळू कमी होऊ लागलं असून, देश दिवसेंदिवस प्रतिगामी बनत चालल्याचं बांगला देशमधील तज्ज्ञांचं आणि जनतेचंही म्हणणं आहे. त्याला कारणीभूत ठरताहेत अलीकडच्या काळातील घटना. त्यातीलच एक प्रमुख घटना म्हणजे बांगला देश सरकारनं शाळांमधील संगीत शिक्षकांवर घातलेली बंदी. देशातील परंपरावादी कट्टरपंथीयांच्या धमक्यांना घाबरून बांगलादेशच्या मोहम्मद युनूस सरकारनं देशातील सर्व प्राथमिक शाळांमधील संगीत शिक्षकांची भरती पूर्णपणे रद्द केली आहे. संगीत हे देशाच्या आणि देशातील संस्कृतीच्या विरोधात असल्याची ओरड अनेक कट्टरपंथी संघटना गेल्या काही काळापासून करीत आहेत. शाळांमधून शिकवलं जाणारं संगीत बंद करावं, संगीत शिक्षकांची भरती रद्द करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी लावून धरली होती. त्यासाठी नुसतं आंदोलनच नाही, तर त्यांनी धमक्याही द्यायला सुरुवात केली होती. या धमक्यांना घाबरून शेवटी बांगला देश सरकारच्या शिक्षण मंत्रालयानं या बदलासंबंधी नवी अधिसूचना जारी केली. तज्ज्ञांनी आणि जनतेनं मात्र या निर्णयाचा जाहीर निषेध आणि विरोध केला आहे. त्यांचं म्हणणं आहे, शाळांमधून संगीत शिक्षण बंद केलं तर मग तालिबान आणि बांगला देश सरकार यांच्यात फरक तो काय राहिला? युनूस सरकारचा हा निर्णय तालिबानच्या विचारसरणीला प्रोत्साहन देतो. तालिबाननंदेखील अशाच प्रकारे अफगाणिस्तानातील शाळांमध्ये संगीतावर पूर्णपणे बंदी घातली आहे. बांगला देशमध्ये शेख हसीना यांचं सरकार उलथून टाकल्यापासून कट्टरपंथी शक्ती पुन्हा सक्रिय झाल्या आहेत. हसीना यांच्या कार्यकाळात ज्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली होती, त्या संघटना आता पुन्हा उघडपणे कार्यरत झाल्या आहेत. अनेक कट्टरपंथी नेते तुरुंगातून फरार झाले आहेत किंवा त्यांची सुटका करण्यात आली आहे. यामध्ये अंसरुल्लाह बांगला टीमचे (एबीटी) प्रमुख मुफ्ती जशिमुद्दीन रहमानी यांच्यासह अनेक दहशतवादी सामील आहेत.



आता जमात-ए-इस्लामी आणि हिफाजत-ए-इस्लाम यांसारख्या संघटना पुन्हा सक्रिय झाल्या आहेत. अलीकडेच ढाका येथे हिज्ब-उत-तहरीर या संघटनेनं 'मार्च फॉर खिलाफत' या अजेंड्याखाली मोर्चा काढला होता, ज्यात बांगला देशमध्ये इस्लामी शासन लागू करण्याची मागणी करण्यात आली होती. जमात-ए-इस्लामी, हिफाजत-ए-इस्लाम आणि इतर अनेक धार्मिक संघटनांनी शाळांच्या अभ्यासक्रमात संगीत विषयाचा समावेश करण्याविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली होती. त्यांचं म्हणणं आहे, शाळांतील विद्यार्थ्यांवर संगीत आणि नृत्य लादणं म्हणजे देशाच्या विरोधातला कट आहे. बहुसंख्य तज्ज्ञांनी सरकारच्या या निर्णयावर कठोर टीका केली आहे. शिक्षणतज्ज्ञ राशेदा चौधरी म्हणतात, तुम्हाला धार्मिक शिक्षण द्यायचं आहे ना? - मग द्या की. पण त्यासाठी संगीतावर बंदी का? तुम्ही कसल्या प्रकारचा समाज तयार करू इच्छित आहात? त्यानं समाजाची, देशाची प्रगती होणार नाही, तर देश अधोगतीला जाईल.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 7 | | 4 | 1 | | 2 |
| | | 6 | | 8 | 9 | | 7 | |
| | 7 | | | 3 | | 5 | | |
| 1 | | 3 | | 2 | | 9 | | |
| | 9 | 2 | 3 | | 5 | 8 | 4 | |
| | | 7 | | 4 | | 6 | | 3 |
| | | 9 | | 6 | | | 3 | |
| | 6 | | 5 | 9 | | 2 | | |
| 3 | | 5 | 4 | | 2 | | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 7 | 8 | 6 | 2 | 1 | 9 | 4 | 3 |
| 9 | 3 | 6 | 8 | 7 | 4 | 2 | 5 | 1 |
| 1 | 2 | 4 | 3 | 5 | 9 | 6 | 7 | 8 |
| 3 | 1 | 9 | 5 | 6 | 8 | 4 | 2 | 7 |
| 4 | 8 | 5 | 2 | 9 | 7 | 1 | 3 | 6 |
| 2 | 6 | 7 | 1 | 4 | 3 | 8 | 9 | 5 |
| 7 | 4 | 1 | 9 | 8 | 5 | 3 | 6 | 2 |
| 8 | 5 | 2 | 4 | 3 | 6 | 7 | 1 | 9 |
| 6 | 9 | 3 | 7 | 1 | 2 | 5 | 8 | 4 |

**पंचांग**
८ नोव्हेंबर २०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:तृतीया ०७:३२:२२

तिथि:चतुर्थी २८:२५:५४+
नक्षत्र:मृगशिर्षा २२:०२:१४
योग:शिव १८:३१:२६
करण:विष्टि ०७:३२:२२
करण:बव १७:५५:१०

## उपदेशाचे डोस

### थांबला तो संपला

तीन मित्र पायी प्रवासाला निघाले होते. डोंगर-दऱ्यांमधून ते खूप चालले होते. उन्हामुळे अंगाची लाही लाही होत होती. त्यांच्याजवळचे पाणी संपले होते. पाणी कुठून आणावे ते त्यांना कळेना. सभोवताली त्यांनी खूप शोध घेतला. ते डोंगरावर चढले आणि वरून खाली पाहून पाण्याच्या साठ्याचा शोध घेऊ लागले. इतक्यात त्यांना एक झरा दिसला. त्यातला एक प्रवासी पाणी पाहून ओरडला, 'अरे, खाली कोणी आहे का, आम्हाला जरा पाणी आणून द्याल? आम्हाला खूप तहान लागली आहे.' दुसरा म्हणाला, 'हा झरा इतक्या खाली का आहे? आता कोण तिथे जाणार? आताच जीव मेटाकुटीला आला आहे. त्यातून तिथपर्यंत जायचे म्हणजे?' या दोघांच्या बोलण्याकडे थोडेदेखील लक्ष न देता तिसरा झऱ्याजवळ गेला आणि पोटभर पाणी पिऊन आलाही. तोपर्यंत हे दोघे नुसताच विचार करत बसले होते; तिसरा प्रवासी म्हणाला, 'तुम्ही बसा, मी जातो आता पुढच्या प्रवासाला, कारण जो थांबला तो संपला...' असे म्हणून तो त्या दोघांना सोडून निघालाही.

कथा उपदेश : जीवनाची उमेदवारी म्हणजे शिक्षण.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८९५ - विल्यम रॉंटजेन यांनी क्ष-किरणांचा शोध जाहीर केला.
- १९५१ - एव्हरेस्टच्या बेस कँपजवळ तीन गिर्यारोहकांनी पावलांचे मोठमोठे ठसे बघितले. यामुळे यतीची अख्यायिका गाजली.

### राष्ट्रीय

- २००५ - नामवंत शास्त्रज्ञ डॉ. रघुनात माशेलकर यांना अमेरिकेतील 'बिझनेस वीक' तर्फे 'स्टार ऑफ एशिया' पुरस्कार जाहीर.


### जन्म

- १८८७ - नानाभाई लक्ष्मण परळकर, क्षात्रैक्य समाजाचे अध्यक्ष.
- १९०९ - नरुभाऊ लिमये, स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार.
- १९१९ - पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे 'पु.लं.', लेखक, नाटककार, संगीतकार, दिग्दर्शक, पटकथा लेखक व अभिनेते.
- १९२७ - लालकृष्ण अडवाणी, ज्येष्ठ भाजपा नेते.

### निधन

- १२२६ - लुईस आठवा, फ्रान्सचा राजा.
- २००७ - कामिनेनी ईश्वर राव, अर्जुन पुरस्कार मिळालेले ऑलिम्पिक भारोत्तोलक.
- २००८ - लॅरी जेम्स, दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता आणि ४०० मीटर शर्यतीचा माजी विश्वविक्रमवीर अमेरिकेचा ॲथलीट.
- २००८ - हेडले हावर्थ, न्युझीलंडचे माजी कसोटी कर्णधार ज्यौफ हावर्थचे मोठे बंधू आणि माजी कसोटी क्रिकेटपटू.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३१



**आडवे शब्द**

२. दक्षता
५. प्रश्नोत्तरांचे जुगलबंदी
९. उपेक्षित
१०. महिना
१२. शासन, शिक्षा
१४. जाडसर दळलेला गहू
१६. कस्तुरी देणारे हरीण
१९. नजरबंदीचा खेळ करणारा
२०. परंपरागत विचारसरणीचा
२३. भांडण
२४. गुंड
२५. समुद्रकिनारा
२९. प्राचीन
३०. दुधाचे पक्वान्न
३१. झाड
३३. उपकारांची जाणीव असलेला
३४. थट्टेखोर
३६. स्त्री
३९. बेलगाम, दावे
४१. रंग उडालेला
४२. काश्मीरचे प्रसिद्ध फळ
४५. सरावाने निष्णात
४८. जास्त
५०. नौका
५१. दया
५२. दरोडेखोर
५३. राग
५४. पुष्टी
५६. परंपरा
५८. समस्त
५९. गर्दी
६०. रागावलेला
६२. खळगा
६४. कोलकात्याचे जुने नाव
६६. नकारत्मक वृत्ती जोपासणारा
६८. बाग, अरण्य
६९. डाग
७१. विनोद (इंग्रजी)
७२. साय
७५. संकुचित वृत्तीचा
७७. हडकुळा
७८. बेळगाव सध्या या राज्यात आहे
७९. बळेच घोड्यावर चढवलेला

**उभे शब्द**

१. अप्राय
२. धोकादायक
३. विष्णूची पत्नी
४. भाजून काढणारे
६. मतभेद, वाद
७. माळ, सर
८. वाचाळ, बहुभाषी
११. पन्ह्याचे फळ
१३. धरती
१५. वायू
१७. प्रशंसा
१८. दोन्हीकडून बडवला जाणारा
१९अ. फजिती
२०. समंजस
२१. व्यवस्थित
२२. प्रेम
२५. अमसुलाचे गरम पेय
२६. युद्धभूमी
२७. हा कोल्हापूरचा तांबडा-पांढरा प्रसिद्ध
२८. शेवट
३०. अडथळा
३२. कोरडा
३५. पांथस्थ
३७. काटा
३८. रामदासांचा ग्रंथराज
३९. आनंद
४०. महिला
४१. प्राक्तन
४३. चीर, सापट
४४. चैन
४६. अकबराशी लढणारा स्वाभिमान राजपूत राजा
४७. भेग
४९. 'स्वामी' कादंबरीचे नायक
५१. कंबर
५४. दासी
५५. काळिमा
५७. ही शाबासकीची असेल तर चांगली!
६१. साहित्यिक
६१अ. लग्नात वाटला जाणारा
६२. प्रत्येक
६३. पुष्कळ
६५. ध्येय
६७. सारखा
६८. माता
७०. पिशाच्च
७१. 'रमी'तील महत्त्वाचे पान
७३. झुंजार
७४. स्तुतीपाठक
७६. तांदळाचा एक पदार्थ

**शब्दकोडे क्र. ३० चे उत्तर**

आडवे उत्तर : ३.भस्म ४.सुतराम ७.द्वारका १०.संत ज्ञानेश्वर १२.रंग १४.मका १५.ताक १६.तहहयात १९.केरसुणी २१.सरूप २३.विशद २६.जरा २८.जीवन २९.जलचर ३१.कुल ३२. नमक ३५.कायम ३६.जवळीक ३७.करवत ३९.हुज्जत ४०.नात ४१.फार ४३.हयगय ४७.अवगत ५०.करमणूक ५२.कवायत ५३.गाजरपारखी ५५.वाकी ५६.गदा ५७.सुरा ५८.मौन ६०.अस्वीकृत ६२.गौरी ६३.साम ६५.गीतांजली ६७. मास ६८.ऋण ६९.उपहार ७०.बरा ७१.मारा ७२.जीत ७३.गर्व ७४.कडा ७६.मिंधा ७७.चीन ७९.रिपु ८०.मार ८१.नश्वर ८२.विपरीत ८३.अघळपघळ

उभे उत्तर : १.कृतक २.साने गुरुजी ३.भरत ५.तरंत ६.राग ८.रमणी ९.काका १०.संतापजनक ११.दहशत १३.द्वार १७.हवि १८.याद २०.सुधा २२.पवना २४.मलम २५.अलक २७.रामरक्षा २९.जयजयकार ३०.रजत ३१.कुळीथ ३३.कव ३४.लज्जत ३८.तफावत ४०.नायक ४२.रग ४४.धमकी ४५.सुकर ४६.निकड ४७.अयशस्वी ४८.तगादा ४९.सुरसुरी ५१.रवानगी ५४.पारा ५६.गत ५९.लाजरा ६०.असमाधान ६१.कृमी ६२.गौण ६३.साप ६४.महाग ६६.तांबडा ६८.ऋत ६९.उर्वरित ७२.जीन ७४.कवळ ७५.गरळ ७७.चीर ७८.तूप ८०.माघ

# पारगाव येथे बिबट्याच्या हल्ल्यातून महिला बचावली

**नारायणगाव: (समर्थ गांवकरी)**

पारगाव( ता.आंबेगाव) येथे बुधवार दि. 5 रोजी चिचगाई मळा येथे रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास अश्विनी शिवाजी ढोबळे (वय 28) या महिलेवर बिबट्याने हल्ला केला व त्यात त्या बचावल्या.

पारगाव येथील चिचगाई वस्ती येथे शिवाजी देवराम ढोबळे यांचे घर असून घराच्या बाजूला गाईंचा गोठा आहे.या गोठ्यात गायी बांधलेल्या होत्या. त्यावेळी शिवाजी ढोबळे यांच्या पत्नी अश्विनी ढोबळे या लघुशंकेसाठी गोठ्याच्या बाजूला आल्या. यावेळी दबा धरून बसलेला बिबट्या हा गोठ्यातील



गाईंवर हल्ला करण्याच्या तयारीत असताना गाईंचा मोठ्याने हंबरण्याचा आवाज आला व अश्विनी या गोठ्याच्या बाजूला कसला आवाज येत आहे म्हणून वळून पाहत असता बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. अंगावर स्वेटर असल्याने बिबट्याचा पंजा स्वेटर मध्ये गुंतल्याने स्वेटर फाटले. व त्या या हल्ल्यातून थोडक्यात बचावल्या. त्यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्या पळून गेला. या बिबट्याच्या भीतीने अश्विनी ढोबळे बेशुद्ध पडल्या होत्या.

जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतामधील ऊसतोडणी सुरु असल्यामुळे बिबट्याचे लपण हे बंद झाले आहे. त्यामुळे बिबट्या हा भक्षाच्या शोधात लोक वस्तीवर येऊ लागला आहे. त्यामुळे नागरिकांना हे बिबटे रात्रीच्या वेळी, दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणात दिसत आहे. माणसावर हल्ल्याच्या घटना घडत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.शेतातील मशागतीची कामे व पिकांना पाणी देण्यासाठी विद्युत पंप सुरू करण्यासाठी रात्री अपरात्री नदीकाठी जावे लागत आहे. बिबट्याच्या भीतीने शेती कशी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांकडे निर्माण झाला आहे.

त्यावेळी त्यांच्या कुटुंबीयांनी तात्काळ पारगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.त्यांच्यावर डॉक्टरांनी उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले. यावेळी मंचर येथील वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी रुग्णालयात जाऊन ढोबळे यांची भेट घेऊन घडलेल्या ठिकाणी तातडीने पिंजरा लावला.



अहिल्यानगर : जिल्ह्यातील राहुरी, नगर, नेवासा आणि पाथर्डी तालुक्यांना संजीवनी ठरलेल्या वांबोरी चारी टप्पा-१ आणि टप्पा-२ या सिंचन योजनांना स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डीले यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी वैभव भाऊराव ढाकणे यांनी सर्व लाभधारक ग्रामस्थांच्या सहीसह जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

## थोडक्यात बातम्या...




### संपूर्ण ज्ञानेश्वरी हेच अद्भुत आश्चर्य : पद्माकर देशपांडे

नाशिक (स. गांवकरी) : 'संपूर्ण ज्ञानेश्वरी हेच अद्भुत आश्चर्य असून ज्ञानेश्वरीतील विविध रस अंतिमत: मोक्षसुखाकडे घेऊन जातात.'असे प्रतिपादन निरूपणकार पद्माकर देशपांडे यांनी केले. ते कलानगर येथील कृतार्थ ज्येष्ठ नागरिक संघात गुरुवार दि. 6 नोव्हेंबरच्या संध्याकाळी 'ज्ञानेश्वरीतील अद्भुत रस ' या विषयावर बोलत होते.यावेळी अध्यक्ष वासुदेव पांडे, उपाध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, कार्यवाह दिनकर कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्रीकांत वडाळकर, पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्या अध्यायातील वीररस, तेराव्या अध्यायातील बिभत्स रसाची उदाहरणे देखील देशपांडे यांनी पेश केली. सभागृहातील श्रोत्यानी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी ज्येष्ठ चित्रकार भि. रा. सावंत यांनी पद्माकर देशपांडे यांचे रेखाचित्र उत्स्फूर्तपणे रेखाटले ते कृतार्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने देशपांडे यांना देण्यात आले. वक्त्यांचा परिचय जयश्री कुलकर्णी यांनी करून दिला तर सूत्रसंचालन दिनकर कुलकर्णी यांनी केले.

### आ. शेखर निकम यांच्या प्रयत्नांना यश; इमारतींसाठी १ कोटींचा निधी मंजूर



चिपळूण (स. गांवकरी) : चिपळूण-संगमेश्वर मतदार संघातील ग्रामविकासाला नवी दिशा देत,आमदार शेखर निकम यांच्या सततच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत चिपळूण तालुक्यातील तिवरे,निरबाडे,वालोटी तसेच संगमेश्वर तालुक्यातील किरडुवे आणि फणसवले या गावांच्या ग्रामपंचायत नवीन इमारती बांधणीसाठी तब्बल १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील प्रशासकीय कामकाज अधिक सुसंघटित आणि जनतेसाठी सुलभ होणार आहे. गाव पातळीवर लोकाभिमुख सुविधा उपलब्ध करून देणे आणि गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे,हा आमदार शेखर निकम यांचा प्रमुख ध्यास आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे चिपळूण-संगमेश्वर मतदार संघात अनेक विकास कामांना गती मिळाली आहे.यामुळे ग्रामविकासाचे चित्रच बदलत आहे. जनतेच्या गरजांची जाण ठेवून, प्रामाणिक प्रयत्नांद्वारे विकास घडवून आणणारे आमदार शेखर निकम हे खऱ्या अर्थाने जनतेचे आधारस्तंभ ठरत आहेत.

### खिरविरे परिसरात भात शेतीचे पंचनामे

एकदरे (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील खिरविरे महसूल मंडळातील अवकाळी पावसाने बाधीत झालेल्या शेतकऱ्यांचे शेतात जाऊन पंचनामे करण्यासाठी खिरविरे महसूल मंडळातील तलाठी जालिंदर घाणे,ग्रामविकास अधिकारी तसेच गावातील ग्रामस्थांनी पिकांची पाहणी केली असता सरसगट पंचनामे करून घ्या असे ग्रामस्थ सागर बेनके यांनी प्रशासनाला सांगितले.गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या अवकाळी पावसामुळे कापणीला आलेले भात पिकाचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत.शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास परतीच्या पावसाने थैमान घातल्यामुळे ओढून घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त होत आहे.सोयाबीन व भात पिकाचे दाणे काळे पडले आहेत.तसेच सततच्या जोरदार पाऊस पडत असल्याने जे भात पिक काढायला आले आहे. त्याची दाणे निखळून पडत आहेत.कापलेल्या भाताचे दाणे गळून पडत आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.त्यामुळे गावातील काही ग्रामस्थांना घेऊन पीक नुकसानीचे पंचनामे करण्यात आले. खिरविरे परिसरातील सर्व शेतकऱ्यांना पिक नुकसान भरपाई सरसगट द्या असे यावेळी गावकऱ्यांनी तलाठी जालिंदर घाणे यांना सांगितले. यावेळी खिरविरे महसूल मंडळातील तलाठी जालिंदर घाणे,ग्रामविकास अधिकारी आंबेकर,सागर बेनके, काशिनाथ बेनके,शांताराम बेनके,सचिन बेनके, योगेश बेनके,शिवनाथ मेंगाळ, व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

### सुरेखा संदिप गुंड यांच्या उमेदवारीसाठी शक्ती प्रदर्शन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : तालुक्यातील पंचायत समिती निवडणुकीत केकती गण मधून सौ सुरेखाताई संदिप गुंड,मा सभापती पंचायत समिती नगर या प्रबळ दावेदार असून त्यांना विजयी होण्याची खात्री आहे जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून अहिल्यानगर तालुक्यातील महाविकास आघाडीच्या वतीने मुलाखती येथील यश ग्रँड हॉटेल मध्ये घेण्यात आल्या. यावेळी मुलाखतीसाठी मोठ्या प्रमाणावर त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांची उपस्थिती राहिली. ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतिषबाजीत शक्ती प्रदर्शन करत त्यांनी अर्ज दाखल केला. सुरेखाताई संदिप गुंड यांच्या सभापती कार्यकाळात त्यांनी मोठ्या प्रमाणात काम केलेले आहे. यामध्ये बचत गटांना ८ कोटीचे कर्जवाटप,खारे खर्जुने येथील गृह संकुलास राज्य सरकारचा प्रथम पुरस्कार,ग्रामीण रुग्णालयास मोठे अर्थसहाय्य मिळालेले आहे तसेच त्यांच्या गणातील सर्व विविध कामे त्यांनी पूर्ण केली आहे.

# श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान भामानगरचे मठाधिपती गुरुवर्य स्वामी अरुणनाथगिरीजी महाराज यांचा अभिष्टचिंतन सोहळा आनंदात साजरा



**(समर्थ गांवकरी)**

ओम चैतन्य अडबंगनाथ महाराज व गुरुवर्य सद्गुरु नारायणगिरीजी महाराज यांच्या अनंत कृपाशीर्वादाने, प्रभू रामचंद्र व लक्ष्मण यांच्या अश्रूने तयार झालेली शिळा व त्या शिळेवर अडबंगनाथांनी बारा वर्षे तपश्चर्या केलेली आहे अशा पवित्र पावन तपोभूमी मध्ये दि.04 नोव्हेंबर वार मंगळवार रोजी गुरुवर्य स्वामी अरुणनाथगिरीजी महाराज यांचा 44 वा अभिष्टचिंतन सोहळा अगदी आनंदात साजरा करण्यात आला. गुरुवर्य स्वामी महाराजांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी हजारो भाविकांची उपस्थिती होती. सर्व भाविकांनी स्वामींजीना अभिष्टचिंतन सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी सर्व क्षेत्रातील भाविकांनी उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर... आयोजक श्री सर्जेराव कोते पाटील शिर्डी, श्री भाऊ भोसले शिर्डी, नवनाथ आहेर शेठजी तळेगाव, वंदनाताई मुरकुटे, श्रीरामपूर पंचायत समिती चे बी.डि.ओ साहेब, पोलीस क्षेत्रातील PSI कणसे साहेब, शेंगाळे दादा व सर्व पोलीस क्षेत्रातील मान्यवर, श्री रायभान पवार साहेब निळवंडे, ह भ प सकाहारी महाराज जाधव, ह भ प रेवजिनाथ महाराज शिंदे, लेखक श्री निळकंठ तरकासे बाबूजी आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वामी महाराजांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजक श्री सर्जेराव कोते शिर्डी व भाऊ भोसले शिर्डी यांनी कार्यक्रमाचे भव्य दिव्य नियोजन केले होते. दुपारी चार वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. अनेक भाविकांनी स्वामी जींना शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. श्री निळकंठ तरकासे बाबूजी यांनी सुंदर अभिष्टचिंतनाचे गीत गायले. तद्नंतर गुरुपूजन सोहळा पार पडला.

स्वामी महाराजांनी सर्व भाविकांना आशीर्वाद दिले व सर्वांचे आभार मानले. त्यानंतर अनेक भाविक महिलांनी स्वामीजींचे औक्षण केलं. सर्व भाविकांनी स्वामीजींचे सत्कार रुपी गुरुपूजन केले. तदनंतर स्वामी अरुणनाथगिरी महाराजांनी आयोजक श्री सर्जेराव भाऊ होते शिर्डी व भाऊ भोसले पाटील शिर्डी यांचा सत्कार केला. स्वामी महाराजांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भव्य दिव्य स्वरूपात अतिशबाजी करण्यात आली. मंदिर परिसरात रांगोळ्या काढण्यात आल्या. त्यानंतर खूप मोठ्या प्रमाणात अन्नदान करण्यात आले. हजारो भाविकांनी अन्नदानाचा लाभ घेतला. स्वामी महाराजांचा अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत चांगल्या प्रकारे भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.

## कांद्याला भाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल

**नारायणगाव : (समर्थ गांवकरी)**



पुणे जिल्ह्यासह जुन्नर, आंबेगाव तालुक्यात अवकाळी पाऊस सुरू आहे. या पावसाचा फटका नवीन लाल कांद्याला बसला आहे. सध्या साठवणीत असलेला जुना कांदा बाजारात दाखल होत आहे.या कांद्यालाही अपेक्षित भाव मिळत नाही.त्यामुळे एकीकडे नवीन पिकाचे नुकसान तर दुसरीकडे जुन्या कांद्याला भाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.कमी भाव मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी येत आहे. परदेशातील घटलेली निर्यात तर दक्षिण भारतातून अपेक्षित मागणी नसल्याने कांद्याला भावच मिळत नाही. त्यामुळे भाव मिळेल,या अपेक्षेने शेतकऱ्यांनी जुना कांदा साठवून दरवर्षी नोव्हेंबरच्या सुरुवातीला नवीन कांदा बाजारात येत असतो. मात्र, अवकाळी पावसामुळे कांदा पिकाचे नुकसान झाले आहे.

## चाकण शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान, चाकण येथे शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी मनिषाताई सुरेशभाऊ गोरे यांना चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी शिवसेनेच्या अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले. उपमुख्यमंत्री शिंदे साहेब म्हणाले, “या लाडक्या बहिणीला बिनविरोध निवडून द्या — हीच खरी स्व. सुरेशभाऊंना श्रद्धांजली ठरेल.”



यावेळी शिंदे साहेबांनी चाकण परिसरात झालेल्या विविध विकासकामांचा उल्लेख करत सांगितले की, स्व. सुरेशभाऊ गोरे यांच्या संकल्पनेतील चाकण शहर पाणीपुरवठा योजनेसाठी १६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्या कामाची गतीने प्रगती सुरू आहे.


तसेच, चाकण नगरपरिषदेच्या वाढीव कर रचनेला स्थगिती देण्याचा निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा देण्यात आला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

याच बरोबर श्री शिंदे यांनी चाकण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आवश्यक पायाभूत सुविधांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमा दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितिनभाऊ गोरे यांनी चाकण शहरात पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत वाहतूक पोलिसांकडून होणारी टोईंग वॅनची कारवाई तात्पुरती थांबवण्याची विनंती केली. यावर शिंदे साहेबांनी तत्काळ प्रतिसाद देत पोलिस आयुक्तांना ही कारवाई थांबविण्याच्या सूचना देण्याचे आश्वासन दिले.

## “सार्वजनिक वाहतूक व्यवस्था प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आहे का”

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील बससेवा प्रवाशांच्या जीवाशी अक्षरशः खेळ करत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. अनेक बस मोडकळीस आलेल्या अवस्थेत, नादुरुस्त आणि अपघातप्रवण बनल्या आहेत, मात्र संबंधित विभाग मात्र डोळेझाक करत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.



दररोज हजारो प्रवासी नवी मुंबई महानगरपालिकेच्या बससेवेचा वापर करतात. मात्र अनेक बसमध्ये ब्रेक फेल, सस्पेन्शन खराब, गंजलेल्या बॉडी, फुटलेल्या सीट्स आणि तुटलेल्या खिडक्या असे दृश्य दिसते. काही बसमध्ये दरवाजे नीट बंद न होणे, इंजिनातून धूर निघणे, तसेच धोकादायक आवाज येणे अशा घटना वारंवार घडत असून, प्रवाशांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी अनेक वेळा महानगरपालिकेकडे तक्रारी नोंदवल्या, तरीही प्रत्यक्षात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

बसचालक आणि वाहक सुद्धा या परिस्थितीत त्रस्त आहेत. “अशा जीर्ण बस रस्त्यावर उतरवणे म्हणजे अपघाताला आमंत्रण देणे,” असे काही चालकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

नवी मुंबईसारख्या आधुनिक शहरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरक्षित आणि सुस्थितीत असणे अपेक्षित आहे. मात्र सध्या परिस्थिती याच्या अगदी उलट दिसत आहे.

## आईच्या दुधाने उमलते सुदृढ बालपण; स्तनपान जागृती

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

आईचे दूध हे बाळासाठी साक्षात अमृत या भावनेला मूर्त रूप देत नांदेड जिल्हा परिषदेने स्तनपान व पोषण विषयक जागृतीसाठी सुरू केलेल्या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाची सुरुवात झाली असून, आयआयटी मुंबई येथील पोषण तज्ज्ञांचे तांत्रिक सहकार्य लाभले आहे. सुरुवातीस महिला व बालविकास तसेच आरोग्य विभागातील निवडक क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना स्तनपान तसेच बालपोषण या विषयावर कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान मार्गदर्शक पुस्तिका व पूरक साहित्य पुरविण्यात आले. यानंतर प्रशिक्षित कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष गृहभेटीद्वारे गर्भवती व स्तनपान करणाऱ्या मातांना योग्य मार्गदर्शन सुरू केले. मातांच्या व बालकांच्या आरोग्य निर्देशांकावर लक्ष ठेवण्यासाठी विशेष मोबाईल ॲप तयार करण्यात आले असून, त्याद्वारे सातत्याने आरोग्य माहिती नोंदवली जाते.

# अतुल देशमुख यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत तालुक्यात भगवा फडकवण्याचा निर्धार

**चाकण : (समर्थ गांवकरी)**

चाकण माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख यांनी राष्ट्रवादी शरद पवार गट तुतारी ची साथ सोडत आज शिवसेनेचे धनुष्य हाती घेतले. त्यांच्या यां भूमिकेने खेड तालुक्याच्या राजकारणचे वातावरण ढवळून निघाले आहे. माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश मोठ्या उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, माजी मंत्री विजयबापू शिवतारे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाला आमदार शरद सोनावणे, जिल्हा अध्यक्ष भगवान पोखरकर, कामगार नेते इरफान सय्यद, तसेच तालुक्यातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामपातळीवरील शेकडो शिवसैनिक व महिला भगिनी उपस्थित होते. अतुल देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमात शिवसेनेचा भगवा हातात घेत प्रवेश केला.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणात बदल :-

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुका लक्षात घेता, अतुल देशमुख यांच्या प्रवेशामुळे खेड तालुक्यातील राजकीय गणित बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक पातळीवर प्रभावी नेतृत्व आणि संघटन कौशल्यामुळे देशमुख यांचा पक्षप्रवेश शिवसेनेला मोठी ताकद देणारा ठरणार आहे.

देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की, “आम्ही सर्व कार्यकर्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करू. तालुक्यातील प्रत्येक गावात शिवसेनेची शाखा स्थापन करणार आहोत. आगामी सर्व निवडणुकांमध्ये नगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद सर्व जागांवर शिवसेना उमेदवार उतरवणार असून तालुक्यात भगवा फडकवू असे आश्वासन दिले.

या प्रवेश सोहळ्यात मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, अतुल देशमुख आणि त्यांचे कार्यकर्ते शिवसेनेत आले हे मी जाहीर करतो. आता तुमचं एकच ध्येय असावं – तालुक्यात भगवा फडकवायचा! सर्वांनी ताकदीने काम केलं तर विरोधकांचे डिपॉझिट जप्त होतील.

शिंदे पुढे म्हणाले, “राजकारणात योग्य वेळी घेतलेला निर्णयच मोठे परिणाम घडवतो. देशमुख यांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेतला असून मूर्ती लहान पण कीर्ती महान असल्याचे त्यांनी सांगितले.

शिंदे यांनी आपल्या भाषणात विरोधकांवर निशाणा साधताना म्हटले, आज मला काही लोक ‘भकास मंत्री’ म्हणतात. पण मुख्यमंत्री असताना मी स्वतः रस्त्यावर उतरून काम केलं. एक साधा शाखा प्रमुख म्हणून सुरुवात करून महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झालो, हे माझ्या कार्यकर्त्यांच्या ताकदीमुळे शक्य झालं.

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांना ३२ हजार रुपयांचे अनुदान, ‘लाडकी बहीण योजना’, ‘एस.टी.मध्ये सवलत’, आणि कर्जमाफी अशा अनेक लोककल्याणकारी योजना आम्ही राबवल्या. महाराष्ट्राच्या जनतेने आमच्यावर विश्वास ठेवला आणि ८० पैकी ६० जागांवर आम्हाला विजय मिळवून दिला.

# उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाची मर्यादा जाहीर

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील उमेदवारांच्या खर्चाच्या मर्यादेत वाढ करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने ही वाढ तब्बल आठ वर्षांनी सुधारित केली आहे. त्यानुसार पुणे महापालिका निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना खर्चाची मर्यादा १५ लाख रुपये तर पिंपरी - चिंचवडसाठी १३ लाख रुपये इतकी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तर, जिल्हा परिषद सदस्यांसाठी नऊ लाख रुपये आणि पंचायत समिती सदस्यांसाठी सहा लाख रुपये इतकी खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. राज्य निवडणुक आयोगाने २०१६-१७ मध्ये खर्चाची मर्यादा ठरविली होती. त्यानंतर खर्चाच्या मर्यादेमध्ये वाढ करण्यात आली नव्हती. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी खर्च करण्याची मर्यादा वाढविण्याची मागणी सातत्याने होती. वाढती महागाई आणि वाढता खर्च लक्षात घेऊन ही खर्चाच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे.

### जिल्हा परिषद-

जिल्हा परिषद सदस्यपदासाठी ९ लाख रुपये, पंचायत समिती सदस्यपदासाठी ६ लाख रुपये

ग्रामपंचायत : सात ते नऊ सदस्य असलेल्या ग्रामपंचायतींसाठी थेट सरपंचपदासाठी ७५ हजार रुपये, सदस्यपदासाठी ४० हजार रुपये

११ ते १३ सदस्य असलेल्या ग्रामपंचायतींसाठी थेट सरपंचपदासाठी १ लाख ५० हजार रुपये, सदस्यपदासाठी ५५ हजार रुपये १५ ते १७ सदस्य असलेल्या ग्रामपंचायतींसाठी थेट सरपंचपदासाठी २ लाख ६५ हजार रुपये, सदस्यपदासाठी ७५ हजार रुपये.

### महापालिका

स्थानिक स्वराज्य संस्था – खर्चाची मर्यादा
मुंबई – १५ लाख रुपये
पुणे – १५ लाख रुपये
पिंपरी चिंचवड – १३ लाख रुपये

### नगरपरिषद

अ वर्ग नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी १५ लाख रुपये, तर सदस्यपदासाठी ५ लाख रुपये

ब वर्ग नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी ११ लाख २५ हजार रुपये, तर सदस्यपदासाठी ३ लाख ५० हजार रुपये

क वर्ग नगरपरिषद नगराध्यक्ष पदासाठी ७ लाख ५० हजार रुपये, तर सदस्यपदासाठी २ लाख ५० हजार रुपये




अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :- सकल मातंग समाजाच्या वतीने १० नोव्हेंबर रोजी विविध मागण्यासाठी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर महा मोर्चाच्या आयोजन केले आहे.त्या संदर्भात आज जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांना निवेदन सादर करून माहिती देण्यात आली. यावेळी विजय भाऊ पठारे, रामभाऊ वडागळे,सुनील उमाप,अंकुश मोहिते,रंजीत वैरागर,किशोर उमाप,रामभाऊ काते,अजय त्रिभुवन,विशाल वाघमारे आदी सह कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### विद्यार्थी दिवस व “वंदे मातरम्” गीतास दीडशे वर्षे पूर्ण

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : हा दिवस पुष्पावती विद्यालयात उत्साहात साजरा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रभावना जागवणारे व देशभक्तीचा जोश निर्माण करणारे “वंदे मातरम्” हे गीत यंदा दीडशे वर्षांचे झाले.या ऐतिहासिक गीताच्या स्मृतीनिमित्त आणि ७ नोव्हेंबर विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याच्या निमित्ताने पुष्पावती विद्यालय, डिंगोरे येथे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला विज्ञान शिक्षक व शिक्षक प्रतिनिधी वैभव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,“वंदे मातरम्” या गीताने स्वातंत्र्यलढ्यात असंख्य देशभक्तांच्या ओठांवर उत्साहाचा जयघोष दिला. या गीतातून भारतमातेप्रती कृतज्ञता, अभिमान आणि प्रेम व्यक्त होते. तसेच ७ नोव्हेंबर १९०० या दिवशी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सातारा येथील शाळेत प्रवेश मिळाला,हा दिवस भारता च्या शैक्षणिक क्रांतीचा आणि युगांतराचा प्रारंभमानला जातो.देशमुख पुढे म्हणाले,“डॉ.आंबेडकर आयुष्यभर विद्यार्थी म्हणून जगले. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवले. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या प्रेरणेने ज्ञानाचा सतत शोध घेत राहावा.” कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी सांगितले की,“विद्यार्थी दिन साजरा करण्यामाग चा हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये शिकण्याची जिज्ञासा आणि समाजसेवेची भावना जागृत करणे हा आहे.”कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रतिलाल बागुल, दिनेश पाटील,दीपा सावंत,अनुराधा नलावडे,साधना तांबे,जगन्नाथ गाढवे यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन दत्तात्रय घोलप यांनी केले.

### साप पकडण्याचा प्रयत्न जीवावर बेतला!

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील सावेडी उपनगरात घडलेल्या एका अत्यंत दुर्दैवी आणि धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सापाला पकडण्याचा प्रयत्न करत असताना सर्पदंश झाल्याने समीर अशोक इंगळे (वय ४०, रा. किंग्स गेट, ब्राह्मण गल्ली, अहिल्यानगर) या एका परिचित सामाजिक कार्यकर्त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, ही घटना बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी सावेडीतील गुलमोहर रोडवरील वरदविनायक कॉलनी परिसरात घडली. या भागात साप निघाल्याची माहिती मिळताच समीर इंगळे यांनी धाडसाने त्या ठिकाणी धाव घेतली आणि स्वतःच साप पकडण्याचा प्रयत्न सुरू केला. मात्र, हा प्रयत्न सुरू असतानाच सापाने त्यांना चावा घेतला. सर्पदंश झाल्यानंतर, इंगळे यांना तातडीने उपचारासाठी एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.रुग्णालयात उपचार सुरू असतानाच गुरुवारी, ६ नोव्हेंबर रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. समीर इंगळे हे त्यांच्या शांत, मनमिळाऊ स्वभावासाठी आणि विविध सामाजिक कार्यांमधील सक्रिय सहभागासाठी परिसरात परिचित होते. त्यांच्या या आकस्मिक निधनाने मंगल गेट, झेंडीगेट आणि सावेडी परिसरासह त्यांच्या मित्रपरिवार व नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे.

## वंदे मातरम्’ गीताला १५० वर्षे पूर्ण : सामूहिक गायनाचे आयोजन

राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)

‘वंदे मातरम्’ गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राजगुरुनगर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मान्यवर, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान सर्वांनी एकत्र येऊन ‘वंदे मातरम्’ या राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले. “वंदे मातरम्, भारत माता की जय!” या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रत्येक तालुक्यात वंदेमातरम या राष्ट्रगीताचे सामूहिक गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.त्यासाठी तालुका स्तरीय समिती गठित करण्यात आली .



कार्यक्रम दरम्यान महसूल प्रतिनिधी निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण, गट शिक्षण अधिकारी अमोल जंगले, पुरवठा निरीक्षक अक्षय कोपारे , महसूल अधिकारी,निलेश घोडके श्री. पिंगळे सर, पंचायत समिती तालुका क्रीडा अधिकारी ,प्रकाश मोहरे.वक्ते बाळासाहेब खांडभोर ,. गड किल्ले संवर्धन सदस्य वर्षा चासकर. क्रीडापटू वैष्णव ठाकूर, भरत महाराज थोरात ,श्रीमती स्वाती शिंदे , साहित्यिक संपत कौदरे,पत्रकार नाजीम इनामदार,उद्योजक प्रशांत टोपे, डॉ.अल्ताफ पठाण संस्थेचे प्राचार्य यू. के सूर्यवंशी आदी मान्यवर समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे,यांनी शासनाच्या वंदे मातरम् सामूहिक गायनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देताना सांगितले की पारतंत्र्यात असलेल्या भारताला स्वतंत्र मिळवून देण्यासाठी पूर्वजांनी राष्ट्रगीत राष्ट्रगान या राष्ट्रीय प्रतीकांचा वापर केला. त्यांना जागृत करण्यासाठी तालुकास्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

प्रमुख वक्ते बाळासाहेब खांडभोर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन संतोष बिन्नर सर, इरफान शेख,अमोल जाधव सर, एस व्ही दरेकर, एस एन शिरसाट, सी एस साळुंखे, श्रीमती ए सी साळुंखे, श्रीमती सुनिता रेळेकर , श्रीमती शैलजा दहिवाळ केले असून कार्यक्रमास हुतात्मा राजगुरू विद्यालय, जिल्हा परिषद विद्यालय शिरोली , चांडोली येथील जिल्हा परिषद शाळा,मुलींची निवासी शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती तेजल पागिरे व श्री संकेत गोकुळे यांनी केले.तर आभार श्री व्ही एम जाधव सर यांनी मानले.

## अपंग कर्मचारी संघटनेची उच्चस्तरीय बैठक

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी/ अधिकारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आ. दिगंबर घाडगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शहा यांच्या निवासस्थानी भेट देऊन दिव्यांगांच्या विविध मागण्यांबाबत निवेदन सादर केले.

गृहमंत्री महोदयांच्या अनुपस्थितीत त्यांच्या स्वीय सहाय्यक व सचिवांशी फलदायी चर्चा झाली. त्यांनी निवेदन स्वीकारून सांगितले की, हे निवेदन माननीय गृहमंत्रींकडे तातडीने पोहोचवून पुढील कार्यवाही केली जाईल.यानंतर शिष्टमंडळाने एस. गोविंदराज आयुक्त,दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग, भारत सरकार यांच्याशी सविस्तर चर्चा केली. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६मधील कलम ३, २०व ३७ नुसार दिव्यांगांना निवडणूक, जनगणना, मतदार नोंदणी व सर्वेक्षण यांसारखी श्रमप्रधान कामे न देणे या विषयावर चर्चा झाली.आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत सांगितले की, भारत निवडणूक आयोगाला शिफारसपत्र लवकरच पाठवले जाईल व प्रत संघटनेस दिली जाईल.

## समर्थ संकुलात पुणे झोनल स्पर्धा व निवड चाचणी संपन्न

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे व समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे झोनल बास्केटबॉल व खो-खो स्पर्धा नुकतीच समर्थ शैक्षणिक संकुलामध्ये संपन्न झाली. अल्ट्राटेक सिमेंट या कंपनीचे विभागीय प्रमुख विशाल कुलकर्णी व संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली या स्पर्धेसाठी मुंबई,पुणे,अहिल्या नगर, रायगड, ठाणे व पालघर या सहा जिल्ह्यातून ६५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचा निकाल



पुढील प्रमाणे :-खो-खो (मुले): प्रथम क्रमांक-डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे,द्वितीय क्रमांक-समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे, तृतीय क्रमांक-अभिनव एज्युकेशन सोसायटीज कॉलेज ऑफ फार्मसी, नऱ्हे खो-खो (मुली):प्रथम क्रमांक-समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हेद्वितीय क्रमांक-समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हेतृतीय क्रमांक-डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे या स्पर्धेमध्ये समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी व समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,बेल्हे या दोन्ही महाविद्यालयांमधून आंतर विभागीय स्पर्धेसाठी पुणे विभागीय संघामध्ये २७ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके यांनी दिली. या विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या पुणे विभागाचे सचिव एच पी नरसुडे, क्रीडा शिक्षक सुरेश काकडे, विनायक वऱ्हाडी, राहुल अहिरे,डॉ.सचिन भालेकर,डॉ. मंगेश होले, डॉ. सचिन दातखिळे,प्रा.सुजित तांबे,प्रा.नितीन महाले,प्रा. गणेश लामखडे यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले, प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मिरजगाव कृषी विभागाचा कारभार 'रामभरोसे'

- अनेक दिवसांपासून मंडळ कृषी अधिकारी पद रिक्त ; शेतकऱ्यांना कार्यालयाचे उंबरडे झिजविण्याची वेळ

कर्जत ता. : (समर्थ गांवकरी)

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील महाराष्ट्र शासनाच्या कृषी मंडल कार्यालयात गेली अनेक दिवसांपासून मंडळ कृषी अधिकारी पद रिक्त असून पूर्णवेळ मंडळ कृषी अधिकारी नसल्याने शेतकऱ्यांची मोठी कुचंबणा होत आहे. त्यामुळे या कृषी विभागाचा कारभार 'रामभरोसे' सुरू असून कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त होत आहे. विभागातील अधिकाऱ्यांत समन्वय नसल्याने येथील कार्यालय देखील अनेकदा बंदच असल्याचे दिसत आहे. विभागाचा




कारभार कसा चालतो, याबाबत सध्यातरी शेतकरी संभ्रमात आहे. कृषी विभागाच्या संबंधित असलेले कामे करण्याकरता शेतकऱ्यांना या ठिकाणी येरझ-या माराव्या लागत आहेत.

मिरजगाव व परिसरातील मंडल मधील अनेक गाव व वाड्या वस्त्यांचा या कार्यालयाशी संबंध येतो. शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, किड रोग नियंत्रण, पूरपरिस्थिती नवीन तंत्रज्ञान शेतकरी मंडल स्थापन करणे अशा योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी खात्याकडे कर्मचारी असणे गरजेचे आहे. मात्र, रिक्त पदामुळे शेतीच्या विकासावर परिणाम होतो.

आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे व बदलत्या वातावरणामुळे कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ, गारपीट अतिवृष्टी अशा नैसर्गिक दृष्टचक्रात अडकलेले शेतकरी, आत्महत्यांचे न संपणारे सत्र असे चित्र एकीकडे असताना, दुसरीकडे शेतकऱ्यांसाठी कार्यरत असणाऱ्या कृषी विभागात मात्र अधिका-याचा वाणवा दिसत आहे.

गैरव्यवस्थापन आणि येथील कार्यालय कायमच बंद राहत असल्याने मिरजगाव कृषी विभागाच्या कार्यालयात अधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांना आपले काम घेऊन जाताना मोठ्या अडचणी निर्माण होत आहे. अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या ठिकाणी पूर्ण वेळ मंडळ कृषि अधिकारी मिळत नसल्याने सध्या तरी मिरजगाव कृषी विभागाचा कारभार वाऱ्यावर व रामभरोसे असल्याचे चित्र दिसत आहे.

एकीकडे महाराष्ट्र शासन कृषी विभाग शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, कृषि समृद्धी योजना, कृषी यांत्रिकीकरण उप अभियान शेततळे, हस्तीकरण योजना, ठिबक आणि तुषार सिंचन योजना अशा अनेक योजना आहेत. या योजनेमधून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य अनुदाने, तंत्रज्ञान आणि इतर सुविधा पुरविण्याचे काम करत आहे. या विविध योजना राबवत असताना या योजनेचा मुख्य उद्देश शेती उत्पादन वाढवणे शेतकऱ्याची उत्पादन वाढवणे. आणि शेती क्षेत्रात विकास करणे आहे. मात्र, या ठिकाणी परिस्थिती उलटीच पहावयास मिळत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मंडळ कृषी अधिकारी पद रिक्त असल्याने कार्यालयातील अधिकाऱ्यांमध्ये समन्वय राहिला नाही. अनेकदा कार्यालय बंद दिसते.

# सुजित झावरे पाटलांच्या पाठीशी मी स्वत: उभा राहील : उपमुख्यमंत्री

- उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थिती पारनेर येथे सुजित झावरे यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश
- पारनेर तालुक्याच्या राजकारणाचा नवा अंक सुरू

पारनेर : (समर्थ गांवकरी)

सुजित झावरे यांच्याकडे धनादेश नसला तरी जनादेश आहे. त्यांच्या मागे मा. आ. स्व. वसंतराव झावरे पाटील यांची पुण्याई आहे. काम करणारा माणूस असे त्यांचे ओखळपत्र आहे. आमदार विठ्ठल लंघे, अमोल खताळ, शरद सोनवणे या आमदारांच्या पंगतीत आता झावरे पाटलांना बसवायचं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकवण्याची आता वेळ आली आहे. पारनेर तालुका हा शिवसेनेचा गड आहे. झावरे पाटील यांच्या रूपाने आता पारनेरच्या शिवसेनेला नवं नेतृत्व मिळालं आहे. यापुढील काळात सुजित झावरे पाटील यांच्या पाठीशी मी भक्कमपणे उभा राहणार आहे असे स्पष्ट मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. पारनेर येथे सुजित झावरे पाटील यांच्या शिवसेना पक्ष प्रवेश मेळाव्यात ते बोलत होते.



अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात शिवसेनेच्या जाहीर मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी 25 सरपंच, अनेक पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित शिवसैनिकांना संबोधित करत झावरे पाटील यांचे स्वागत केले आणि त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. झावरे पाटील यांच्याकडे धनादेश नसला तरी जनादेश आहे, असे शिंदे म्हणाले. या पक्षप्रवेशाने पारनेर तालुक्यात आणि अहिल्यानगर जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढली आहे.

मेळाव्यात शिंदे यांनी पारनेरच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. मनरेगा निधी वाढवण्याचे निर्देश मंत्री भरत गोगावले यांना देणार असून, पारनेर पाणीपुरवठा योजनेचा डीपीआर तात्काळ मंजूर होईल, तसेच नगरपालिकेच्या कचरा प्रकल्पासाठी निधी उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. बिबट्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या घटनांवर नियंत्रणासाठी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रभावी उपाययोजना करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका जिंकल्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भगवा फडकवण्याचा संकल्प करूया, असे आवाहन शिंदे यांनी केले.

### सुजित झावरे यांचा १४ वर्षाचा राजकीय वनवास संपला

गेल्या १४ वर्षापासून सुजित झावरे पाटील यांच्याकडे पारनेर तालुक्यात कोणतीही राजकीय सत्ता नव्हती तरीही कार्यकर्त्यांचा संच त्यांच्याकडे टिकून होता राजकीय सत्ता नसताना विकास कामे करत राहणे ही त्यांची जमेची बाजू होती आज तालुक्यात सर्वात मोठे संघटन हे सुजित झावरे यांच्याकडेच आहे. हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. सुजित झावरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पारनेर येथे शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला त्यामुळे आता सत्ताधारी पक्षात त्यांना काम करण्याची संधी मिळाल्याने त्यांचा राजकीय वनवास संपला आहे. असे मत राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

### शिवसेना पक्षप्रवेश मेळाव्यात गर्दीचा उच्चांक

पारनेर येथे सुजित झावरे पाटील यांच्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. पारनेर शहरात झालेल्या या कार्यक्रमाला 15 हजारा पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. ही सभा तालुक्याच्या आजपर्यंतच्या इतिहासात सर्वाधिक मोठी राजकीय सभा ठरली सुजित झावरे यांच्या शिवसेना प्रवेशाने तालुक्याच्या राजकारणातील गणित आता बदलणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# वंदे मातरम् गीताने भारतीयांना दिली प्रेरणा

## विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम : दीडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 'वंदे मातरम्' गीताचे सामूहिक गायन

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

बंकिमचंद्र चटोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या गीताने भारतीय स्वातंत्र्य चळवळीला स्फुलिंग मिळाले. या गीताने भारतीय एकत्र झाले. त्यांना प्रेरणा मिळाल्याने भारतीय नागरिक स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.



बंकिमचंद्र चटोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या गीतास 150 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्यातर्फे आज सकाळी महात्मा नगर मैदानावर 'वंदे मातरम्' या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, उपजिल्हाधिकारी सीमा अहिरे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक आर. एस. मुंडासे, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी इंद्रभान काकड, तहसीलदार अमोल निकम, व्याख्याते डॉ. सुनील अमृतकर आदी उपस्थित होते. यावेळी सुवर्णा क्षीरसागर व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'वंदे मातरम्' हे गीत सादर केले, तर संस्कार भारतीच्या सहकार्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर लघु नाटिका सादर केली. आयुक्त डॉ. गेडाम म्हणाले की, 'वंदे मातरम्' या गीताला फार मोठा इतिहास आहे. हे गीत म्हणजे भारत मातेला वंदन करणारे गीत आहे.



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :- जिल्हापरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून जिल्हा परिषद दरेवाड़ी गटातून किरण भास्कर गांगर्डे हे प्रबळ दावेदार असून त्यांना त्यांच्या सामाजिक कार्यामुळे विजयी होण्याची खात्री आहे, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या नगर तालुक्यातील महाविकास आघाडीच्या वतीने मुलाखती येथे घेण्यात आल्या.

## थोडक्यात बातम्या...



### कु. मानसी बेंद्रे सीए फायनल परीक्षेत उत्तीर्ण

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भिंगार येथील श्री इलेक्ट्रिकल्सचे संचालक दिवंगत अलिप्त किसनराव बेंद्रे यांची कु. मानसी बेंद्रे ही धाकटी कन्या असून तिने सी.ए. फायनल परीक्षेत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. या यशासाठी तिला वरीष्ठांचे आणि तिच्या आई अनुराधा बेंद्रे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.



### जेष्ट नागरीक कै. ज्ञानेश्वर दुधाळ यांचे निधन

शिवनेरी (स. गांवकरी) : जेष्ठ नागरिक प्रगतशील बागायतदार कै. ज्ञानेश्वर महादू दुधाळ वय ६५ वर्ष रा. कुमशेत यांचे निधन झाले आहे. याच्या पाठीमागे पत्नी ,दोन मुल , एक मुलगी,सुना, नातवंडे , चुलते व मित्र परिवार असा मोठा परिवार आहे. कै.ज्ञानेश्वर दुधाळ यांनी शून्यातून भूमातेची सेवा करून विविध पिके घेतली आहे . विकास व विशाल दुधाळ या दोन्ही मुलांनी गावातील सामाजिक धार्मिक शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला आहे.

### अखेर राज्यातील ५५०० पोलिसांचा डिजि लोन प्रश्न मिटला; घरांचा वनवास संपला

■ धडाकेबाज युवा प्रतिष्ठानच्या मागणीला यश

ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्यातील पोलिसांच्या घराचे स्वप्न पूर्ण कधी होईल याची पोलिस गेल्या तीन वर्षांपासून आतुरतेने वाट पाहत होते. याविषयी धडाकेबाज युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, ग्रामीण व शहर पोलिसांसाठी पाठपुरावा करून प्रत्यक्ष भेट घेऊन पोलिसांचा DG लोनचा प्रश्न सोडवण्याची मागणी धडाकेबाज युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अमोल धनराज केंद्रे करत होते. दरम्यान माजी मंत्री सुधीर भाऊ मुनगंटीवार यांची भेट घेऊन पोलिसांच्या व्यथा अडचणी समजून घेतल्या. जो पर्यंत डी जी लोन पोलिसांना मिळत नाही तो पर्यंत पोलिसांच्या घराचा मार्ग मोकळा होत नाही त्यासाठी स्वस्थ बसणार नाही. धडाकेबाज युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अमोल केंद्रे. प्रत्येकवेळी पाठपुरावा करत होते. सुधीर भाऊंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून अखेर राज्यातील साडेपाच हजार पोलिसांचे डीजी होम लोन ( पोलीस गृह अग्रीम कर्ज ) मंजूर करून घेण्यात आले. धडाकेबाज युवा प्रतिष्ठानच्या मागणीला यश मिळाल्याने धडाकेबाज युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अमोल धनराज केंद्रे यांच्या वतीने महाराष्ट्र राज्यांचे मुख्यमंत्री तसेच पोलिस हृदय सम्राट आदरिय माजी मंत्री सुधीर भाऊ मनगटीवर यांचे मनपुर्वक आभार.



### मुंब्रा खाडीत सलग दोन दिवस आढळले दोन मृतदेह

ठाणे (स. गांवकरी) : मुंब्रा येथील रेतीबंदर खाडीमध्ये गुरुवारी दुपारी एका महिलेचा मृतदेह आढळल्याची घटना ताजी असतानाच शुक्रवारी एका पुरूषाचा मृतदेह आढळला आहे. या लागोपाठ घडलेल्या घटनेमुळे मुंब्रा परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची नोंद मुंब्रा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिसांनी हा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठविला आहे. या दोन्ही मृतदेहाची ओळख अद्याप पटली नसल्याची माहिती मुंब्रा पोलिसांनी दिली. मुंब्रा येथे बालाजी काकडे गणेश विसर्जन घाट जवळ असलेल्या रेतीबंदर खाडीमध्ये शुक्रवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास एका अज्ञात पुरूषाचा (अंदाजे वय २५ ते ३०) मृतदेह आढळला. या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी मुंब्रा पोलीस अधिकारी आणि कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले होते. स्थानिक मच्छीमार यांच्या मदतीने खाडीतील मृतदेह बाहेर काढण्यात आला. मुंब्रा पोलीस कर्मचारी यांच्या ताब्यात हा मृतदेह देण्यात आला आहे. सदर मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू असल्याचे मुंब्रा पोलिसांनी सांगितले आहे.

### किनवटमध्ये सोमवारपासून उमेदवारी अर्ज स्वीकारणार

किनवट (स. गांवकरी) : नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्रीमती शारदा चोंडेकर यांच्या अध्यक्षतेखाली किनवट नगरपरिषद कार्यालयात पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषदेत निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम जाहीर करण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा कालावधी १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आला आहे. नामनिर्देशन पत्र दाखल व स्वीकारण्याचे ठिकाण नवीन प्रशासकीय इमारत, किनवट नगरपरिषद कार्यालय असेल. नामनिर्देशन पत्रांची छाननी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता होईल. नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम मुदत अपील नसल्यास १९ ते २१ नोव्हेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत, तर अपील असल्यास २१ ते २५ नोव्हेंबरपर्यंत राहणार आहे. उमेदवारांची अंतिम यादी व निवडणूक चिन्हांचे वाटप २६ नोव्हेंबर रोजी करण्यात येईल.

# कळवण नाकोडे ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री ग्राम समृद्धी योजनेचा प्रभावी कार्यक्रम संपन्न

## महिला सक्षमीकरणावर सह गट विकास अधिकारी मा.श्री .वंदना सोनवणे मॅडम यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**नाशिक कळवण : (समर्थ गांवकरी)**

कळवण – कळवण तालुक्यातील नाकोडे ग्रामपंचायतीमध्ये मुख्यमंत्री ग्राम समृद्धी योजना अंतर्गत जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सह गट विकास अधिकारी मा. श्रीमती वंदना सोनवणे मॅडम उपस्थित होत्या.या प्रसंगी सोनवणे मॅडम यांनी गावातील महिला व पुरुष नागरिकांना थेट संबोधित करताना ग्रामविकासातील महिलांच्या भूमिकेचे महत्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, "गावाचा खरा विकास महिलांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही.



महिलांच्या आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक जागृतीच्या माध्यमातूनच ग्रामसमृद्धी साध्य होऊ शकते."सोनवणे मॅडम यांनी महिला आरोग्य, मुलींचे शिक्षण, महिला अत्याचार, बालविवाह, बालमजुरी, आशा सेविकांची भूमिका आणि स्त्री स्वावलंबन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यांनी उपस्थित महिलांना आवाहन केले की — "आजच्या काळात महिलांनी स्वतःच्या आरोग्याबरोबरच आपल्या मुलींच्या शिक्षणावर भर द्यावा. बालविवाह आणि बालमजुरीविरोधात प्रत्येक स्त्रीने जागरूक राहून आपल्या समाजात बदल घडवावा."

कार्यक्रमादरम्यान विस्तार अधिकारी युवराज सोनवणे यांनी उपस्थित महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत सांगितले की, महिलांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून चालवल्या जाणाऱ्या योजना गावागावात पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येक महिला बचत गट व ग्रामपंचायतीची आहे. तसेच आत्मा योजनेचे समन्वयक यांनी शेतकरी उत्पादक गटाविषयी सखोल अशी माहिती दिली

" ग्रामविकस अधिकारी नाकोडे महिला सक्षम झाली, तर तिचं कुटुंब सक्षम होतं; आणि सक्षम कुटुंब म्हणजे सक्षम गाव", असे प्रतिपादन करत त्यांनी उपस्थित सर्वांना एकत्र येऊन गाव समृद्धीचा नवा आदर्श निर्माण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला उपस्थित ,सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, तसेच गावातील महिला, पुरुष आणि तरुण नागरिक, मुख्याध्यापक , महीला बचत गटप्रतिनिधी , आत्मा योजनेचे समन्वयक, अंगणवाडी, आशा वर्कर्स, जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांनी कार्यक्रमादरम्यान उत्स्फूर्त सहभाग घेत प्रश्न विचारले, आपली मते मांडली आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम हाती घेण्याची तयारी दर्शवली .कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामविकास अधिकाऱ्यांनी केले तर आभार प्रदर्शन जि शाळा मुख्याध्यापकांनी केले.

# सर्वसामान्य व विधायक समस्या सोडवण्यासाठी निवेदन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मांडवी परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या सर्वसामान्य व विधायक समस्या सोडवण्याच्या दृष्टीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) राजकुमार विलासराव मुक्कावार यांच्याकडे मांडवी सर्कल परिसरातील विविध प्रलंबित व विकासात्मक प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करत त्या सोडवण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या जिल्हा महिला चिटणीस सौ. प्रियंकाताई प्रबोध राठोड यांनी प्रबोध राठोड यांच्यासह महत्त्वपूर्ण निवेदन सादर केले. या निवेदनाद्वारे मांडवी सर्कल व परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी, प्रलंबित योजना व स्थानिक विकासाच्या गरजा याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. मुख्यतः खालील मुद्द्यांवर सविस्तर चर्चा व मागणी करण्यात आली : जलजीवन मिशन अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करणे व खंदलेले रस्ते पुनर्निर्माण करणे – या योजनेअंतर्गत झालेल्या अपूर्ण कामामुळे नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीबाबत लक्ष वेधून तातडीने दुरुस्ती व रस्ते पुनर्बांधणीची मागणी करण्यात आली.

# प्रवीण पडवळ यांची नाशिक गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयास भेट

■ तपासाच्या प्रशिक्षणाचा घेतला आढावा

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके) श्री. प्रवीण पडवळ यांनी शुक्रवारी (दि ०७) नाशिक येथील गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयास भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी विद्यालयात पदवीधर पोलीस अंमलदारांना देण्यात येत असलेल्या गुन्हे तपासाच्या प्रशिक्षणाचा सखोल आढावा घेतला. पडवळ यांनी प्रथम प्रशिक्षण विद्यालयाच्या कामकाजाची आणि सुरू



असलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती घेतली. विशेषतः, पदवीधर पोलीस अंमलदारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'गुन्हे तपास' (Investigation) प्रशिक्षणावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. बदलत्या गुन्हेगारीचे स्वरूप लक्षात घेता, अंमलदारांना आधुनिक तपास पद्धती, सायबर गुन्हे, तांत्रिक पुरावे गोळा करणे आणि कायदेशीर बाबींची पूर्तता याविषयी दिले जाणारे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी प्रशिक्षणाचा दर्जा आणि अभ्यासक्रम याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रशिक्षणाचा आढावा घेतल्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थी अंमलदारांशी थेट संवाद साधला आणि त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. "गुन्ह्यांचा तपास हा पोलीस दलाचा कणा आहे," असे सांगत त्यांनी निष्पक्ष, जलद आणि शास्त्रोक्त पद्धतीने तपास करण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच, पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलिसांनी संवेदनशीलतेने आणि व्यावसायिकतेने काम करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

अपर पोलीस महासंचालकांच्या या भेटीमुळे आणि मार्गदर्शनामुळे प्रशिक्षणार्थी अंमलदारांचा उत्साह द्विगुणित झाला. या भेटीवेळी गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य श्री. चंद्रकांत गवळी, उपप्राचार्य मनोज खंडाळे, तसेच अंतरवर्ग, बाहयवर्ग अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

# खोट्या नोटा व सोन्यासारख्या दिसणाऱ्या ३८ बिस्कीटांसह आरोपी अटक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

फिर्यादी नामे नितेश हरिश्चंद्र शेळके यांना एका इसमाने रु. एक लाख दिल्यास त्या बदल्यात तिन आठवडयांमध्ये ३ लाख रुपये देतो असे सांगितल्याने त्याबाबत संशय आल्याने कापुरबावडी पोलीस ठाणेस गु.र.नं. ८०६/२०२५ बी.एन.एस क. ३१८(४) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. फिर्यादी यांनी सदरचा इसम हा दि.०३/११/२०२५ रोजी २ वा. च्या सुमारास ग्लोबल हॉस्पीटल जवळ, साकेत बाळकुम रोड, ठाणे येथे नोटा घेवुन येणार असल्याचे सांगितल्याने कापुरबावडी पोलीस पथकाने अत्यंत शिताफिने



त्यास व त्याचे साथीदारांना संशय येणार नाही अशा पध्दतीने सापळा रचुन तो फिर्यादी यांना खऱ्या नोटांच्या बदल्यात खेळण्यातल्या नोटा देत असताना मिळुन आल्याने त्यास सदर ठिकाणावरुन ताब्यात घेतले दरम्यान आरोपीचा साथीदार संधीचा फायदा घेवुन तेथुन पळुन गेला असुन त्याचा शोध चालु आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपीकडुन घटनास्थळावरुन तसेच त्याचे घराची झडती घेवुन मोठ्या प्रमाणात बळीत व्यक्तींची फसवणुक करण्याकरीता ठेवलेल्या खेळण्यातील नोटा व सोन्याच्या बिस्कीटासारखी बनावट पिवळया धातुची बिस्कीटे हस्तगत करण्यात आली आहेत. आरोपी हे लोकांना विश्वासात घेवुन त्यांना कमी मुदतीमध्ये अधिक पैसे मिळवुन देतो असे सांगुन त्यांचेकडुन रक्कम घेवुन त्यांना फसवुन खेळण्यातील नोटांची बंडले देत असत. सदर बंडलांच्या वर व खाली अश्या प्रत्येकी दोन दोन खऱ्या नोटा ठेवुन संपूर्ण बंडल खऱ्या नोटांचे असल्याचे भासवित असत.



# स्वारातीम विद्यापीठात समूह गान

**नांदेड: (समर्थ गांवकरी)**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत अतुलनीय प्रेरणा देणाऱ्या "वंदे मातरम" या राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा गीताच्या १५० वर्षपूर्ती वर्धापन दिनानिमित्त शासनाच्या सूचनेनुसार राज्यभर एकाच वेळी "वंदे मातरम" समूह गान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि. ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता अधिसभा सभागृहात समूहगान उत्साहात पार पडले.

# जामखेडमध्ये वंदे मातरम गीताचा १५० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

दिनांक 07 नोव्हेंबर 2025 रोजी जामखेड मध्ये ल.ना. होशिंग विद्यालय जामखेड या ठिकाणी वंदे मातरम सामूहिक गीतगायन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जामखेड मार्फत करण्यात आलेले होते. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 1875 साली लिहिलेले वंदे मातरम या गीताचे स्वातंत्र्यलढ्यात तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडात ही अनन्यसाधारण महत्त्व आहे. आनंदमठ या कादंबरीतील हे गीत भारतमातेच्या स्तुतीचे प्रतीक असून स्वातंत्र्यलढ्यातील असंख्य क्रांतिकारकांसाठी प्रेरणादायी



ठरले आहे या गीतास 07 नोव्हेंबर 2025 रोजी 150 वर्षे पूर्ण होत आहेत त्या निमित्ताने राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये वंदे मातरम गीताच्या 150 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून वंदे मातरम सामूहिक गीत गायन व सांस्कृतिक कार्यक्रम ल.ना .होशिंग विद्यालय जामखेड मध्ये आयोजित करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शुभम जाधव ,गटविकास अधिकारी जामखेड व प्रमुख वक्ते श्री अमित राऊत, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी आयटीआय मधील प्रशिक्षणार्थ्यांनी देशभक्तीपर लघुनाटिका सादर केली. ल.ना. होशिंग विद्यालयातील विद्यार्थिनीं समवेत विविध शाळांमधील सुमारे 5000 विद्यार्थी, शासकीय, अशासकीय कर्मचारी व नागरिकांनी सामूहिकरीत्या वंदे मातरम या गीताचे गायन केले. या कार्यक्रमांमध्ये जामखेड तालुक्यातील सर्व शासकीय आस्थापना मधील अधिकारी व त्यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास जामखेड मधील प्रसिद्ध उद्योजक रमेश भाऊ गुगळे ,संतोष फिरोदिया, विवेक कुलकर्णी, श्री अजय साळवे, श्री प्रदीप पांडुळे,निकम महाराज, विनायक राऊत, आनंद राजगुरू, बाळासाहेब दळवी ,उमेश देशमुख, प्रा. धनंजय जवळेकर ,संतोष टेकाळे श्रीमती सना शेख, डॉ. सुनील बोराडे ,प्राजक्ता खोमणे, चेतन दासनूर हे उपस्थित होते. यावेळी जामखेड शहरांमधील नागेश विद्यालय, कन्या विद्यालय, नवीन मराठी शाळा, खेमानंद इंग्लिश स्कूल, कालिका पोद्दार लर्न स्कूल, अँग्लो उर्दू विद्यालय इत्यादी विद्यालयाने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. जामखेड शहरातील व तालुक्यातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, पालक, मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ल.ना. होशिंग विद्यालय जामखेडचे प्राचार्य मा. श्री बी. ए. पारखे यांनी केले. तर आभार प्रदर्शन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मा. श्री अजय वाघ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ल.ना. होशिंग विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री अनिल देडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालय,जामखेड मधील सर्व गटनिदेशक ,शिल्पनिदेशक, सर्व कर्मचारी व प्रशिक्षणार्थी तसेच एनएसएस कार्यक्रमाधिकारी श्री गजेंद्र जाधव व स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

# शिवसेनेची जि.प. निवडणुकीसाठी स्वबळाची तयारी : आ. बालाजी कल्याणकर

- शिवसेनेची आढावा बैठक, इच्छुक उमेदवारांच्या घेतल्या मुलाखती



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्ह्यामध्ये शिवसेना पक्षाची राजकीय ताकद अधिक असून कार्यकर्त्यांना या निवडणुकीत संधी मिळाली पाहिजे आणि सन्मानजणक वाटा जागेचा मिळत नसेल तर शिवसेना जिल्हा परिषद निवडणूक स्वबळावर लढवणार आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी या निवडणुकीच्या अनुषंगाने कामाला लागून अधिक जोमाने काम करावे. नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात, असे मत नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी व्यक्त केले.

नांदेड उत्तर मतदारसंघातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने दि. ७ नोव्हेंबर रोजी सायाळ ता. नांदेड येथे आयोजित केलेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना आ. कल्याणकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नांदेड उत्तरचे आ. बालाजीराव कल्याणकर, नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर, शिवालय प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संध्याताई कल्याणकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधरराव बडुरे, सहसंपर्कप्रमुख दर्शनसिंघ सिद्धू, सहसंपर्कप्रमुख संतोष भारसावडे, सरपंच परिषदेचे अध्यक्ष नारायण कदम, महिला जिल्हाप्रमुख अपर्णा नेरलकर, उपजिल्हाप्रमुख राजेश चव्हाण, जयवंत पाटील, दीपा थोरवट, काशिनाथ बोकारे, गणेश बोकारे तालुकाप्रमुख,तालुकाप्रमुख धनंजय पावडे, मिनाक्षी सूर्यवंशी, माधव महाराज हिंगमिरे ,बाबुराव वाघ, देवीदास सरोदे यांच्यासह आदीची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. बालाजीराव कल्याणकर म्हणाले की, शिवसेनेच्या धोरणाप्रमाणे ८०% समाजकारण आणि २०% राजकारण हे धोरण राबवत आम्ही जनतेची सेवा करत आहोत. एका महिन्याच्या आत जि.प.च्या निवडणुका लागणार असून कार्यकर्त्यांनी या निवडणुकीच्या कामासाठी पक्षसंघटन वाढवून नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात. जिल्ह्यामध्ये शिवसेनेचे ४ आमदार असल्यामुळे आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि पंचायत समितीवर फडकवू. जे इतरांना ५० वर्षामध्ये विकास कामे करता आली नाहीत ती आम्ही करून दाखवली आहेत. त्यामुळे जनतेचा विश्वास आहे.



**श्रीगोंदा तालुका :** प्राथमिक आरोग्य केंद्र, साईदीप सह्याद्री हॉस्पिटल अहिल्यानगर व ग्रामपंचायत पिंपळगाव पिसा यांचे संयुक्त विद्यमाने हृदयविकार, मेंदू मणके विकार, किडनी प्रोटेस्ट तसेच विविध आजारांवर आरोग्य शिबिर 7 नोव्हेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात आले होते यामधे जवळपास 325 पेक्षा जास्त रुग्णांना तपासणी व प्राथमिक उपचार साईदीप सह्याद्री हॉस्पिटल चे तज्ञ डॉ भूषण खर्चे न्यूरोसेर्जन डॉ अजय झोरे कार्डिओलॉजिस्ट यांनी केले असून आजारावरती मोफत उपचार व ऑपरेशन साईदीप सह्याद्री हॉस्पिटल अहिल्यानगर येथे आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत होणार आहेत.

## थोडक्यात बातम्या...



### गणोरे : खतोडे व मंडलिक यांना जीवन गौरव पुरस्कार


गणोरे (स. गांवकरी) : ग्राहक पंचायत अकोले तालुका अध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, व गणोरे यथील ग्राहक पंचायत चे ज्येष्ठ सदस्य सखाराम खतोडे ,यांचा ग्राहक पंचायत महाराष्ट्र नाशिक विभाग यांच्यातर्फे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नंदुरबार जिल्हातील तळोदा येथेही नाशिक विभागीय ग्राहक पंचायतीचा नुकताच अभ्यास वर्ग संपन्न झाला. आमदार यावेळी पाडवी यांच्या हस्ते या अभ्यास वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. ग्राहक पंचायत चे राज्य अध्यक्ष डॉ विजयजी लाड यांचे सह राज्यातील अहिल्यानगर ,नाशिक, धुळे ,नंदुरबार ,जळगाव, जिल्ह्यातील ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पुजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. राज्य ग्राहक पंचायतीचे कामा संदर्भात धाराशिव येथील मेधाताई कुलकर्णी व अहिल्यानगरचे जिल्हा संघटक प्रा डॉ राजेंद्र कळमकर यांनी माहिती दिली. यावेळी खतोडे व मंडलिक यांनी ग्राहक पंचायती माध्यमातुन दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना सन्मान पत्र देऊन जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तळोदा येथील प्रा. जयपाल सिंह शिंदे, भुसावळ येथील संजयजी शुक्ला, अँड, सुरेंद्र जी सोनवणे,अरुण वाघमारे, रणजीत श्रीगोड, प्रा. चंद्रकांत डागा, पी झेड कुवर, चंद्रकांत योशिराव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



### गुरुनानक देवजींनी जगाला शांतता, एकतेची शिकवण दिली : डॉ. देशमुख

अकोले (स. गांवकरी) : अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडेमीमध्ये गुरुनानक जयंती साजरी करण्यात आली. गुरुनानक जयंती हा शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देव यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाला गुरु पर्व आणि प्रकाश उत्सव म्हणूनही ओळखले जाते. यानिमित्त रुबी द रेड हाऊसने शाळेमध्ये विशेष परिपाठाचे आयोजन केले. सर्वप्रथम गुरुनानक यांच्या प्रतिमेचे पूजन वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्रचार्या राधिका नवले, प्राजक्ता नेटके, वृषाली शेटे, सुनिल खताळ, शकुंतला भांगरे व सुरेखा शेटे यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यांनतर दिशा ढगे, आयांती मालुंजकर, आर्वी वाकचौरे, लावण्या लोहोटे, सिद्धी देशमुख, समीक्षा भारंबे, आर्यन आभाळे, तनिष्का तोरमल यांनी गुरुनानक जयंती विषयी माहिती, गुरुनानक यांची शिकवण आपल्या मनोगतातून सांगितली व त्यांनतर विद्यार्थ्यांसाठी गुरुनानक जयंतीवर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी या प्रश्नमंजूषेत सहभाग घेतला. यावेळी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी गुरु नानक हे शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले शीख गुरू होते. त्यांनी सर्व लोकांमध्ये समानता, प्रेम, शांतता ,एकता व आदराची शिकवण दिली, तसेच जात, धर्म किंवा लिंग यावर आधारित भेदभावाला विरोध केला , अशी माहिती आपल्या मनोगतातून दिली. कार्यक्रमासाठी वसुंधरा अकॅडेमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्रचार्या राधिका नवले, प्राजक्ता नेटके, वृषाली शेटे, सुनिल खताळ सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रुबी द रेड हाऊसच्या हाऊस मास्टर शकुंतला भांगरे व सुरेखा शेटे, कॅप्टन, प्रीफेक्टस व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिशा ढगे या विद्यार्थिनीने केले.

### वैजापुर : पोखरी गावात सर्वरोग निदान शिबीर संपन्न



वैजापुर (स. गांवकरी) : पोखरी (ता वैजापुर) येथे सर्वरोग निदान शिबीर संपन्न झाले असून यामध्ये १६४ रुग्नांनी या शिबीरात सहभाग नोंदवुन तपासण्या केल्या. श्री साई जनविकास प्रतिष्ठाणचे साई आयुर्वेदिक मेडिकल महाविद्यालय , रिसर्च संस्था खंडाळा , ग्रामपंचायत कार्यालय व विवीध कार्यकारी सोसायरीच्यावतीने शिबीराचे आयोजन करण्यात आले होते सकाळी ९ ते २ यावेळेत महादेव मंदिर परिसरात आयोजित केलेल्या सर्वरोग निदान शिबीरात पोटाचे विकार, आतड्याचे विकार, मणक्याचे , हाडाचे आजार , श्वसनाचा आजार, त्वचेचे आजार , मधुमेह, हरयरोग यासह स्त्रियांचे आजार आदि आजारांविषयी तपासण्या कुरण्यात आल्या त्याचप्रमाणे येथील आदर्श जिल्हा उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता सहावी ते दहावीच्या मुलींची तपासनी करून त्यांना मार्गदर्शन केले .ग्रामीण भागातील महिलांमध्ये आजाराविषयी अनेक समस्या असतात परंतु त्या लपविल्या जातात त्यासाठी ग्रामीण भागात अशी शिबीरे घेऊन या आजारांविषयी जनजागृती केली जाते. यावेळी डॉ येवले, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापु ठुबे, मुख्याध्यापक काळे सर , शालेय समितीचे अध्यक्ष आप्पासाहेब ठुबे, विवीध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमन मिनाताई ठुबे यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पडघा बालाजी नगरातील बोगस भूमिगत गटार कामाचा भंडाफोड!

- जिल्हा परिषद बांधकाम विभागाची दखल – ठेकेदारावर कारवाईचे आदेश
- ग्रामपंचायत प्रशासनास उपविभागीय अभियंत्यांचा लेखी इशारा

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघा बालाजी नगर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून करण्यात आलेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामात मोठ्या गैरव्यवहाराचा भंडाफोड झाला आहे.स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतर अखेर जिल्हा परिषद बांधकाम विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून बोगस काम असल्याचे निष्पन्न केले आहे. यानंतर उपविभागीय अभियंत्यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला ठेकेदारावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने ग्रामपंचायतीचा कारभार पुन्हा एकदा चौकटीत आला आहे. बालाजी नगरमधील भूमिगत गटार योजनेसाठी सुमारे २६ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. मात्र,प्रत्यक्षात गटार नळीचा



उतार चुकीचा,सिमेंटची गुणवत्ता निकृष्ट,तर काही ठिकाणी काम अपूर्णच ठेवण्यात आलेले दिसून आले.नागरिकांच्या तक्रारीनुसार गटारातील पाणी वाहत न जाता रस्त्यावर ओसंडून वाहू लागले.परिणामी दुर्गंधी,डास आणि रोगराईचा त्रास वाढला. “ग्रामपंचायतने आम्हाला स्वच्छतेचं स्वप्न दाखवलं,पण प्रत्यक्षात आम्हाला मिळाली ती दुर्गंधी आणि बोगस कामाची शिक्षा!” असे संतप्त नागरिकांनी सांगितले.

नागरिकांनी दिलेल्या तक्रारीवरून ठाणे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने चौकशी समिती गठित केली.या समितीने नुकतीच पडघा बालाजी नगर येथे प्रत्यक्ष पाहणी केली.अहवालात स्पष्ट नमूद करण्यात आले की,-- “गटार योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे असून,ठेकेदाराने तांत्रिक अटींचे उल्लंघन केले आहे.संबंधित ठेकेदार व ग्रामपंचायत जबाबदार आहेत.”

या निष्कर्षानंतर उपविभागीय अभियंता यांनी ठेकेदारावर तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. तसेच ग्रामपंचायत प्रशासनास “अशा प्रकारची कामे भविष्यात सहन केली जाणार नाहीत”* असा इशाराही दिला आहे.

संबंधित ठेकेदाराने मात्र स्वतःवरच्या आरोपांना फेटाळून लावत “काम नियमानुसार केलं असून,काही ठिकाणी स्थानिक अडचणींमुळे पाणी साचले असावे”असा बचाव केला आहे. परंतु अभियंत्यांच्या अहवालानुसार किमान ७ ठिकाणी गटार लाईन तुटलेली,वाकलेली किंवा गाळाने बंद झालेली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणात काही ग्रामपंचायत सदस्य आणि माजी पदाधिकाऱ्यांचा ठेकेदाराशी संबंध असल्याची चर्चा गावात जोरात आहे.“कंत्राट मंजूर करताना गुणवत्ता पाहिली का?”आणि “निधीच्या बदल्यात कोणाला किती फायदा झाला?” या प्रश्नांवर ग्रामस्थ चर्चा करत आहेत.काही नागरिकांनी लोकायुक्त आणि ग्रामीण विकास विभागाकडेही तक्रार दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे.

### उपविभागीय अभियंत्यांचा आदेश

उपविभागीय अभियंता यांनी ग्रामपंचायतीला लेखी आदेश देत नमूद केले आहे की, “सदर ठेकेदारास तातडीने काम दुरुस्तीचे आदेश द्यावेत.जर दुरुस्ती योग्यरित्या झाली नाही तर संबंधित ठेकेदाराचा हप्ता थांबवावा आणि भविष्यातील कंत्राटांमधून काळ्या यादीत टाकण्यात यावे.” त्याचबरोबर ग्रामपंचायतीने केलेल्या सर्व भूमिगत गटार कामांची तपासणी अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पडघा बालाजी नगरातील भूमिगत गटार योजनेचे बोगस काम हे केवळ तांत्रिक नाही,तर गावस्तरावर चालणाऱ्या भ्रष्टाचाराचे प्रत्यक्ष उदाहरण ठरत आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाने केलेली कारवाई ही पहिली पायरी असली तरी पुढील पावले निर्णायक ठरणार आहेत.

# सत्ताधाऱ्यांना जागे करण्यासाठी प्रथम तारुचा "रॅप' प्रभावी

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

आपल्या जीवनात येणाऱ्या त्रासांना व्यक्त करण्यासाठी आणि तो त्रास राज्यकर्त्यांपर्यंत पोहचविण्यासाठी आज तंत्रज्ञान युगाच्या काळात अनेक नवीन साधणे तयार झाली.त्यातच नांदेडचा युवक प्रथम युवराज तारुने रॅपच्या माध्यमातून नांदेडच नव्हे तर राज्यात झालेली अतिवृष्टी आणि महापुराच्या पार्श्वभूमीवर रॅपच्या माध्यमातून आणि निखळ ग्रामीण मराठी भाषेत रॅपच्या माध्यमातून राज्यकर्त्यांना ओला दुष्काळ जाहीर करण्याची केलेली मागणी आमच्या लेखणीने दखल घ्यावी अशीच आहे. भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा फक्त वर्तनमानपत्रेच जनतेचे दु:ख राज्यकर्त्यांसमोर मांडत होती. त्यानंतर टेलिव्हीजन आले. आज तर अनेक वृत्तवाहिन्या तयार झाल्या. पण त्या कुठे तरी शासनाच्या गळाला लागलेल्या दिसतात. म्हणून समाजाने, जनतेने, युवकांनी आणि त्रासलेल्या नागरीकांनी व्हाटसऍप, इंस्टाग्राम, फेसबुक, ट्विटर, एक्स या माध्यमातून आपल्या त्रासाला व्यक्त करण्यासाठी एक नवीन मार्ग शोधला. हा मार्ग पण प्रशंसनियच आहे.

# सदगुरू असेल तर धैर्य आपोआप निर्माण होते : विलास पुजारी

### महिला व साधकांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

मनुष्य जन्म हा दुर्मिळ आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात दुःखे, संकट, अडचणी, समस्या ह्या असतातच परंतु त्याला घाबरून जीवन संपविणे हे त्याचे उत्तर नाही तर त्याला धैर्याने सामोरे गेले पाहिजे आणि व्यक्तीच्या जीवनात सदगुरू असेल तर ते धैर्य मनात आपोआप निर्माण होते, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी केले. शहरातील स्वामी समर्थ सेवा केंद्रात महीला व साधकांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,



त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुजारी बोलत होते.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते अॅड. हरीहर गर्जे, सेवा केंद्राचे सेवेकरी विष्णुपंत चिंतामणी, माजी नगरसेविका मंगलताई कोकाटे, शैलैश चातुर, सुनिल बांगर, अभिजित कुलकर्णी, अनिल कटारिया, पोलीस कर्मचारी नागेश वाघ, चव्हाण आदींसह महीला भाविक व सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना पुजारी म्हणाले की, आज समाजात अगदी छोट्या छोट्या गोष्टींमुळे व्यक्ती खासकरुन महीला वर्ग युवती तरुण हे नकारात्मक विचार करून टोकाचे पाऊल उचलतात व जीवन संपवतात परंतु हे कृत्य योग्य नाही. या घटनेनंतर होणारे कुटुंब व समाजातील परिणाम भयावह असतात. हे सर्व रोखायचे असतील तर त्याला पर्याय हा सदगुरूचे शरण आहे. अनेक साधु संतांनी आपल्याला हीच शिकवण दिली आहे की, जगातील कोणत्याही व्यक्तीचे जीवन हे सर्व सुखी नसते. आलेल्या सर्व प्रसंगात संयमाने वाटचाल करीत जीवन सुखमय बनवावे, ज्यावेळी मन अशांत अस्थिर होते. त्यावेळी प्रभुचे चिंतन, नामस्मरण हे व्यक्तीला त्या प्रसंगातून संकटातुन तारते.

# कुंडलवाडी नगरपालिकेसाठी भाजपा इच्छुकांच्या मुलाखती

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

होऊ घातलेल्या देगलूर , बिलोली , कुंडलवाडी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या इच्छुकांच्या खा. डॉ. अजित गोपछडे , आ. जितेश अंतापुरकर आणि जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे आणि नांदेड महानगर अध्यक्ष अमरनाथ राजुरकर यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतींना प्रचंड प्रतिसाद मिळाला असून असंख्य इच्छुकांनी मुलाखती दिल्या आहेत. यावेळी खा. डॉ.अजित गोपछडे, आ. जितेश



अंतापुरकर, नांदेड महानगर अध्यक्ष तथा विधान परिषदेचे माजी आमदार अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ .संतुकराव हंबर्डे, लक्ष्मणराव ठक्करवाड, शंकरराव कंतेवार, शिवाजीराव देशमुख बळेगावकर आदींची उपस्थिती होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सर्वच घटकांचा समतोल विकास साधला जात आहे . यात नांदेड जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी ही भरपूर तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीला उदंड यश मिळाले आहे . त्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विजय मिळविण्यासाठी आणि सत्ता स्थापना करून सर्वसामान्यांचा विकास करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात जोरदार तयारी सुरू आहे.

# इच्छुक उमेदवारांच्या आज नांदेड येथे मुलाखती

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर किनवट शहरात आज राजकीय हालचालींना वेग आला असून भारतीय जनता पक्षाच्या इच्छुक उमेदवारांचा आज नांदेड दौरा होणार आहे. दिनांक ८ नोव्हेंबर रोजी नांदेड येथील प्रगती मैदानावर भाजपाच्या नगर परिषद निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पक्षश्रेष्ठींनी घेण्यात येणार असल्याने किनवट शहरातील इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांकडून जय्यत तयारी सुरू आहे. आज दिवसभर किनवट शहरात राजकीय हालचालींची उथळता जाणवली. अनेक इच्छुक उमेदवार आपल्या कार्यकर्त्यांसह नांदेडकडे रवाना होण्याच्या तयारीत असून, शहरात तुलनेने शुकशुकाटाचे वातावरण पाहायला मिळाले. दुसरीकडे नांदेडमध्ये भाजपाच्या विविध नगर परिषदा, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषद निवडणुकीतील इच्छुक उमेदवारांची लगबग वाढली आहे.

# वंदे मातरम गीत जेवढे प्रेरणादायी तेवढेच राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग जागवणारे

### आमदार मोनिका राजळे : औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून तालुकास्तरीय कार्यक्रम

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

वंदे मातरम गीत जेवढे प्रेरणादायी तेवढेच राष्ट्रभक्तीचे स्फुलिंग मनात जागवणारे आहे.एका गीताने संपूर्ण राष्ट्र भावनिक रेशीम धाग्याने गुंफले जाऊन याच्या केवळ श्रवणाने सुद्धा राष्ट्राविषयी नकारात्मक भाव मनातून दूर जातात,असे मत आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केले.

वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सवाचे आयोजन राज्य शासनाच्या वतीने राज्यभर आज एकाच वेळी करण्यात आले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून तालुकास्तरीय कार्यक्रम बाबूजी आव्हाड महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झाला.यासाठी शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी, विविध सामाजिक स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, तालुकास्तरीय प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभागाचे अधिकारी यासह निमंत्रित मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष तहसीलदार डॉ.उद्धव नाईक,प्रांताधिकारी प्रसाद मते,महंत आदिनाथ शास्त्री महाराज,क्रीडापटू सचिन शिरसाट,नगर संस्था प्रतिनिधी भारती आसलकर, संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड,प्राचार्य बबन चौरे,मुख्याध्यापक शरद मेढे,वन परिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे,प्रमुख मार्गदर्शक मेघा चिंतामणी,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाहक अरविंद पारगावकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राजळे म्हणाल्या, बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेले गीत राष्ट्रप्रेमी व्यक्तींच्या मनात रुंजी घालत आहे. प्रतिभावंत गीतकार म्हणून त्यांची संपूर्ण देशाला ओळख आहे ७ नोव्हेंबर १८७५ रोजी या गीताचा जन्म झाला. या गीताने पुढे इतिहास घडविला देशभक्तीच्या भाव जागृत करणारे साहित्य जसे अजरामर झाले तसे या गीताच्या ओळी सुद्धा अजरामर झाल्या आहेत.आपण जे दररोज गीत गातो ते या काव्याचे पहिले कडवे आहे. अनेकांना विशेषता नव्या पिढीला पूर्ण गीत माहीत नाही.यानिमित्ताने सर्व शाळा महाविद्यालयामध्ये संपूर्ण गीत दररोज गायले जाऊन संस्था पातळीवर या गीताची प्रत दर्शनी भागी लावावी.यामुळे पुर्ण गीत किमान वाचले तरी जाईल. साहित्यामध्ये बुद्धी,मन व विचारांचे एकत्रित प्रकटीकरण झाल्यास देशवासीयांना राष्ट्र कार्यासाठी



समर्पण भावनेने कार्य करण्यास अधिक सुलभ होऊ शकेल. संत,कवी,साहित्य, प्रबोधनकार अशा साहित्य साधकांनी लिहिते व्हावे. राष्ट्रासाठी लिहिते व्हावे, प्रखर व राष्ट्रनिष्ठ तरुणांची फौज देशकार्यासाठी तत्पर झाल्यास प्रगतीचा वेग आणखी वाढणार आहे. शासनाने अत्यंत स्तुत्य अशा उपक्रमाचे आयोजन करून देश कार्यासाठी सर्वांनाच प्रेरित केले आहे. देशासाठी समर्पण भाव ठेवूनच पुढे वाटचाल करावी लागेल. स्थानिक संयोजकांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने आयोजन केल्याने कार्यक्रमाचा हेतू साध्य झाला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तम लोखंडचूर, सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके तर आभार ज्योती बडे यांनी मानले. संदीप गोराणे, योगेश चौगुले व सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कर्करोग तपासणी आणि जनजागृती शिबिर संपन्न

## बदलापूरमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे: (समर्थ गांवकरी)

ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना सुलभ, दर्जेदार आणि सशक्त आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे आणि इंडियन कॅन्सर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने असंसर्गजन्य आजार तपासणी व जनजागृती शिबिर प्राथमिक आरोग्य केंद्र, बदलापूर येथे यशस्वीपणे पार पडले. हा उपक्रम जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

या शिबिराचा उद्देश कर्करोगाचे लवकर निदान करून जीवन वाचविणे तसेच नागरिकांमध्ये जनजागृती वाढवून आरोग्यदायी जीवनशैलीकडे प्रवृत्त करणे हा



होता. तपासणीदरम्यान मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग या तीन प्रमुख प्रकारांच्या तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय डायबिटीस (मधुमेह) आणि उच्च रक्तदाब (हायपरटेन्शन) यांसारख्या असंसर्गजन्य आजारांची तपासणी देखील करण्यात आली.

शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांच्या टीमने ३० वर्षांवरील नागरिकांची तपासणी केली. महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे निदान HPV DNA टेस्ट आणि VIA टेस्टिंग द्वारे करण्यात आले. मुखरोग व स्त्रीरोग तज्ञांनी संपूर्ण आरोग्य तपासणी केली, तर फिजिशियन डॉक्टरांनी डायबिटीस व रक्तदाब तपासणी करून सल्ला दिला.

एकूण ५६ नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला, यामध्ये १३ पुरुष आणि ४३ महिला नागरिकांचा सहभाग होता.

## प्राचीन संहिता गुरुकुल व रशियातील 'ट्रिनिटी' यांच्यात सामंजस्य करार



पुणे : भारतीय आयुर्वेदाच्या प्रचार व प्रसारासाठी, तसेच रशियामध्ये आयुर्वेदाचे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी पुण्यातील प्राचीन संहिता गुरुकुल व रशियातील ट्रिनिटी व्हिलेज सेंटर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. प्राचीन संहिता गुरुकुलाचे संस्थापक डॉ. हरीश पाटणकर व ट्रिनिटी व्हिलेजचे प्रमुख मिरोशनीचेन्को अलेक्से अर्काडेव्हीच यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. डॉ. हरीश पाटणकर म्हणाले, "या सामंजस्य करारामुळे भारतीय वैद्यांना रशियामध्ये येण्यासाठी मदत होईल. येथे योग, आयुर्वेदाची प्रॅक्टिस व अभ्यासक्रम, प्रशिक्षण उपलब्ध होणार आहे. याअंतर्गत रशियामध्ये प्राचीन संहिता गुरूकुल सुरु होणार असून, विविध अभ्यासक्रम चालवता येणार आहेत. आयुर्वेदातील विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी 'फॅकल्टी एक्स्चेंज' उपक्रमांत रशियात सोय करता येईल. आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करत आयुष व भारतातील काही नामवंत संस्था, रशियातील ब्रिक्स युनिव्हर्सिटी, रुडान युनिव्हर्सिटीसोबत सेमिनार घेता येतील. रशियन लोकांना हवा असलेला भारतातील आयुर्वेद त्यांच्यापर्यंत पोहचविणे आता सोपे होणार आहे. रशिया व भारत यांची अनेक दशकांची मैत्री आणखी दृढ होण्यास मदत होईल."

## थोडक्यात बातम्या...

### हुसेन पठाण यांचे हृदयविकाराने निधन



वैजापुर (स. गांवकरी) : जातेगाव (ता.वैजापुर ) येथील हुसेन सांडु पठाण (वय-५८) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले .ते मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल वैजापुर येथे सहशिक्षक म्हणुन कार्यरत होते .३१ जानेवारी २०२६ रोजी ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार होते त्यांच्या पाश्चात पत्नी, एक मुलगा ,एक मुलगी , भाऊ असा मोठा परिवार आहे.

### बिलोली पालिका मुख्याधिकारी पदी गंधाली पवार रुजू



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : बिलोली नगरपालिका मुख्याधिकारी पदी गंधाली जगदिश पवार या रुजू झाले आहेत.यापुर्वी त्यांनी नायगाव नगरपंचायत येथे मुख्याधिकारी म्हणून काम पाहिले आहे .बिलोली नगरपालिकेच्या निवडणुका लागल्या मुळे येथे पुर्णवेळ मुख्याधिकारी असावा अशी मागणी होती त्याची दखल घेत शासनाने त्यांची नियुक्ती केली असून आज प्रथम समयी रुजू झाल्या असून प्रभारी मुख्याधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार बालाजी मिठ्ठेवाड यांच्या कडून पदभार स्वीकारला आहे.

### ५९०० विद्यार्थी आणि २०० अधिकारी कर्मचारी यांनी गायले वंदे मातरम् गीत

संगमनेर तालुका (स. गांवकरी) : वंदे मातरम् गीतास 150 वर्ष पूर्ण झाल्याने संगमनेर येथील भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुलात जवळपास 5900 विद्यार्थी आणि 200 अधिकारी कर्मचारी यांनी सामूहिक वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन केले. बंकिमचंद्र चटर्जी यांनी 7 नोव्हेंबर 1875 साळी लिहिलेल्या गीतास 150 वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडासंकुलात गीतगायन,देशभक्तीपर गीते,वकृत्व स्पर्धा,निबंधलेखन,सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे विविध उपक्रम शाहीर विठ्ठल उमप शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र संगमनेर यांचे वतीने राबविण्यात आले. कार्यक्रमारिता प्रांताधिकारी श्री अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, संगमनेर शहर पोलिस निरीक्षक श्री बारवणकर, योगेश कासट,अविनाश पुलाटे,सुमेध संत,उद्योगपती संदीप फटांगरे,आदींसह प्रशासन अधिकारी जालिंदर खताळ,क्रीडापटू प्रणिती सोमण,आदी मान्यवरांसह 26 अधिकारी,164 कर्मचारी,21 शाळा व त्यांचे 4112 विद्यार्थी,4 महाविद्यालय व त्यांचे 787 विद्यार्थ्यांसह.,तालुक्यातील 10 आय. टी. आय.कॉलेज आणि त्यांच्या 1001 प्रशिक्षणार्थी तसेच त्यांचे प्राचार्य,उपप्राचार्य,शिक्षक, कर्मचारी यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

### वंदे मातरम् संघटनेच्या टीमकडून काश्मीरमधील जवानांना फराळ



पुणे (स. गांवकरी) : वंदे मातरम् संघटनेच्या टीमकडून जम्मू-काश्मीरमधील जवानांना फराळ वाटप करण्यात आला. काश्मीरच्या श्रीनगरमधील लाल चौक, हरिसिंग स्ट्रीट, पंचमुखी हनुमान मंदिर यासह सीमेवर तैनात जवानांना दिवाळी फराळ देऊन वंदे मातरम् संघटनेने देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच कार्तिक पौर्णिमा आणि वैकुंठ चतुर्दशीच्या शुभमुहूर्तावर येथे कायमस्वरूपी बसवलेल्या गणपतीची विधिवत पूजा व भंडारा संपन्न झाला. यावेळी 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया', भारतमाता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी वंदे मातरम् संघटनेचे प्रदेश अध्यक्ष सचिन जामगे, आयटी व माहिती अधिकार अध्यक्ष विशाल शिंदे, संपर्क प्रमुख अमोल भुरेवार, मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक व जवान तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गजानन काटे यांना "राष्ट्र गौरव पुरस्कार" – बुलढाण्याचा अभिमान, पत्रकारितेचा जयघोष !

शेगाव : (समर्थ गांवकरी)

मलकापूरच्या मातीतून घडलेले निर्भीड, सजग आणि जनतेच्या हक्कासाठी आवाज उठवणारे पत्रकार गजानन काटे यांनी पुन्हा एकदा बुलढाणा जिल्ह्याचा अभिमान उंचावला आहे. पत्रकारितेतील त्यांच्या उल्लेखनीय, निःस्वार्थ, आणि प्रखर योगदानाबद्दल त्यांना "राष्ट्र गौरव पुरस्कार 2025" या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले. हा सन्मान म्हणजे एका प्रामाणिक लेखणीचा, सत्याशी निष्ठा राखणाऱ्या पत्रकाराचा आणि समाजाच्या विवेकाला जागं ठेवणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान आहे.



भव्य सोहळा – थाटात पार पडले राष्ट्र गौरव पुरस्कार वितरण!

डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया यांच्या वतीने मलकापूर येथे हा भव्य पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. समाजातील विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींना या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला प्रसारमाध्यमांचे मान्यवर, पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गजानन काटे यांच्या लेखणीचा दम – सत्याचे प्रतिबिंब असलेली पत्रकारिता!

गजानन काटे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकऱ्यांच्या अडचणी, प्रशासनातील त्रुटी आणि जनतेच्या हक्कासाठी लढणारी पत्रकारिता केली आहे. त्यांच्या लेखणीतून केवळ बातम्या नाही तर समाजजागृतीचा झंकार उमटतो. "पत्रकारिता म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या चमच्याची नाही, तर जनतेच्या वेदनेची भाषा" — ही विचारसरणी त्यांनी नेहमीच जपली आहे.

त्यांच्या धडाडीच्या वृत्तीमुळे आणि अचूक माहिती सादर करण्याच्या कौशल्यामुळे त्यांनी दैनिक विश्वजगत ला वाचकप्रिय बनवले. सत्य आणि तटस्थतेचा आग्रह, समाजहिताचे भान आणि सामान्य जनतेच्या समस्या अग्रभागी मांडण्याची त्यांची वृत्ती यामुळे गजानन काटे हे आजच्या पिढीसाठी प्रेरणास्थान बनले आहेत.

सन्मानाचा क्षण – टाळ्यांचा गजर, अभिनंदनाचा वर्षाव!

पुरस्कार स्वीकारताना सभागृहात उपस्थित मान्यवरांनी उभे राहून जोरदार टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. सहकारी पत्रकार, मित्रपरिवार आणि नागरिकांनी फुलांच्या पुष्पगुच्छांनी त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमात बोलताना काही वरिष्ठ पत्रकारांनी सांगितले – "गजानन काटे हे फक्त पत्रकार नाहीत, तर लोकशाहीचा जिवंत आवाज आहेत. त्यांची लेखणी ही समाजातील अन्यायाविरुद्धचा संघर्ष आहे. त्यांच्या कार्यामुळे मलकापूरची पत्रकारिता महाराष्ट्राच्या नकाशावर ठळकपणे झळकली आहे."

संस्थेचा उपक्रम – ग्रामीण पत्रकारांना प्रेरणा देणारा उपक्रम!

डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने या पुरस्काराद्वारे ग्रामीण आणि स्थानिक स्तरावर प्रामाणिक पत्रकारिता करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे. या सन्मानामुळे असंख्य नवोदित पत्रकारांना नवसंजीवनी मिळणार आहे.

अभिनंदनाचा वर्षाव – अभिव्यक्ती सामर्थ्य परिवाराचे हार्दिक शुभेच्छा!

दैनिक अभिव्यक्ती सामर्थ्य परिवाराच्या वतीने गजानन काटे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळत राहो, अशी शुभेच्छा देण्यात आल्या.

पत्रकारितेचा खरा अर्थ म्हणजे – निर्भीडपणा, जबाबदारी आणि समाजाशी नाते.

# व्हर्जिन खोबरेल तेल प्रत्येक ऋतूत का उपयुक्त?

पुणे : (समर्थ गांवकरी)

■ डॉ. शिल्पा व्होरा, मुख्य संशोधन आणि विकास अधिकारी, मॅरिको लिमिटेड व तज्ञ, पॅराशूट ॲडव्हान्स्ड बेबी

भारतीय संस्कृतीत बाळांची मालिश ही फक्त दिनचर्या नसून एक जपलेली परंपरा आहे. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली ही सवय बाळाच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त मानली जाते. सौम्य मालिशमुळे रक्ताभिसरण सुधारते, हाडे सशक्त बनतात, पचनक्रिया सुलभ होते आणि झोपेची गुणवत्ता वाढते.

शिवाय, या प्रक्रियेद्वारे पालक आणि बाळामध्ये एक गहिरे नाते तयार होते. मात्र ऋतुबदलासोबत बाळाच्या त्वचेची गरजही बदलते. याच पार्श्वभूमीवर व्हर्जिन खोबरेल तेल हे सर्व ऋतूंमध्ये उपयुक्त ठरणारे नैसर्गिक उपाय मानले जाते. पॅराशूट ॲडव्हान्स्ड बेबी मसाज ऑइल हे १००% नैसर्गिक व्हर्जिन खोबरेल तेलापासून तयार केलेले असून, यात व्हिटॅमिन ई आणि एफ मुबलक प्रमाणात आढळतात.

# वंदे मातरमच्या १५० व्या वर्षानिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम

ठाणे: (समर्थ गांवकरी)

"वंदे मातरम" हे केवळ एक गाणे नसून ते आपल्या राष्ट्राचा अभिमान आहे, भारताच्या आत्म्याचा आवाज आहे, असे उद्गार शेठ एन. के. टी. कॉलेजचे माजी विद्यार्थी व दर्शन संस्थेचे अध्यक्ष श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी काढले.

वंदे मातरमच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त आयोजित या विशेष कार्यक्रमास श्रीमती एदिया शालियान (आचार्य इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज), वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती मानुषी बागची मॅडम, विद्यार्थी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या



संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना श्री नानजीभाई ठक्कर म्हणाले की, "भारत माता, गाय माता, पाणी माता, पृथ्वी माता आणि पंच माता या पाच मातांचे स्मरण केल्याशिवाय कोणीही राहू शकत नाही. दररोज सकाळी देवाचे स्मरण करण्यापूर्वी आपण या पाच मातांना नमन केले पाहिजे." ते पुढे म्हणाले, "आज आपण सर्वांनी प्रतिज्ञा करूया की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शांचे पालन करून शिक्षणाद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवू." या प्रसंगी श्रीमती मानुषी बागची मॅडम म्हणाल्या की, "देश गुलामगिरीच्या साखळ्यांमध्ये जखडलेला असताना बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी 'वंदे मातरम' हे गाणे लिहिले. या गाण्याने लाखो भारतीयांच्या हृदयात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली. आपण सर्वांनी दररोज 'वंदे मातरम्' च्या नादात भारतमातेचे स्मरण करावे आणि आपल्या कृतीने, आचरणाने आणि संस्कृतीने देशाचे नाव उज्ज्वल करावे." कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती एदिया शालियान यांनी भावपूर्ण शब्दांत आपले विचार व्यक्त केले.

त्या म्हणाल्या, "आजचा ७ नोव्हेंबर हा दिवस विशेष आहे, कारण आजच्याच दिवशी आपल्या लाडक्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचा पहिला टप्पा पार केला होता. बाबासाहेबांचे जीवनच आपल्याला शिक्षण, समता आणि न्याय यासाठी प्रेरणा देते."

# विवाह सोहळ्यात ज्वलंत हिंदुत्वाचे पुरस्कर्ते मा. सुरेशजी चव्हाणके यांच्यासमवेत डॉ. विश्वासराव आरोटे यांची विशेष भेट!

सिन्नर: (समर्थ गांवकरी)

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे आणि राष्ट्रवादी विचारांचे प्रखर प्रवर्तक म्हणून ओळखले जाणारे सुदर्शन न्यूज चॅनेलचे संपादक मा. सुरेशजी चव्हाणके यांची भेट महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी एका विवाह सोहळ्यात घेतली. ही भेट अत्यंत आत्मीयतेने आणि आपुलकीने पार पडली. पत्रकारिता, राष्ट्रहित, हिंदुत्व, आणि सामाजिक जबाबदारी यासारख्या विषयांवर दोन्ही दिग्गजांमध्ये थोडा संवाद





झाला. डॉ. विश्वासराव आरोटे हे अनेक वर्षांपासून सक्रिय पत्रकारिता करत असताना राष्ट्रप्रेम आणि समाजहिताला अग्रस्थानी ठेवतात. तर सुरेशजी चव्हाणके यांनी सुदर्शन न्यूजच्या माध्यमातून ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करून राष्ट्रवादी पत्रकारितेला एक वेगळी दिशा दिली आहे.

या दोघा पत्रकारांची भेट म्हणजे "विचारांच्या दोन प्रवाहांचा संगम" असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या विवाह सोहळ्यात लामखडे मामा आणि छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विलास भाऊ पांगारकर हेही उपस्थित होते. त्यांनी या प्रसंगी दोघा पत्रकारांच्या दीर्घकाळ चालत आलेल्या मैत्रीबद्दल आठवणी शेअर केल्या. डॉ. आरोटे आणि सुरेशजी चव्हाणके यांचे अनेक वर्षांचे पत्रकारिता क्षेत्रातील सहकार्य आणि विचारसाम्य आजही ताजेतवाने आहे.

सामाजिक, धार्मिक आणि राष्ट्रहिताच्या कार्यात झटणाऱ्या या दोन पत्रकार दिग्गजांची भेट योगायोगाने एका विवाह सोहळ्यात झाली असली तरी, ती भावनिक आणि प्रेरणादायी ठरली. या भेटीतून "पत्रकारितेचा हेतू केवळ बातमी देणे नव्हे, तर समाज जागृत ठेवणे हा आहे" हा विचार पुन्हा अधोरेखित झाला.

राष्ट्रवाद, हिंदुत्व आणि प्रामाणिक पत्रकारितेचा संगम घडवणाऱ्या या दोन्ही पत्रकारांच्या भेटीने पत्रकारिता क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# लहित गावासाठी सहा कोटींचा विकास निधी आणणाऱ्या सौ. रेश्मा अमोल गोडसे

अकोले : (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील लहित खुर्द गावाच्या विकासासाठी तब्बल सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणणाऱ्या सौ. रेश्मा अमोल गोडसे या आज अकोले पंचायत समिती निवडणूक 2025 मध्ये ब्राम्हणवाडा गणातून इच्छुक उमेदवार म्हणून चर्चेत आहेत.

गावोगाव दारी विकास पोहोचविण्याची भावना, महिलांच्या नेतृत्वाचा आत्मविश्वास आणि जनतेच्या हक्कांसाठी लढण्याची तयारी — या सर्व गुणांमुळे त्या अकोले तालुक्यातील आश्वासक महिला नेतृत्व म्हणून उदयास येत आहेत.

**शैक्षणिक व कौटुंबिक पार्श्वभूमी :** सौ. रेश्मा अमोल गोडसे या लहित खुर्द गावच्या रहिवासी असून त्यांचे शिक्षण बीसीए (B.C.A.) इंग्रजी माध्यमात पूर्ण झाले आहे.

त्यांचा जन्म व माहेर बोरी कोतुळ (अकोले ) येथे असून त्या श्री. भरत नागनाथ साबळे यांच्या कन्या आहेत. आजी-आजोबा वेणूबाई व नागनाथ पिराजी साबळे यांचे संस्कार लाभलेले आहेत.

विवाहानंतर त्या कोंडीभाऊ एकनाथ गोडसे यांच्या सूनबाई बनल्या आणि गोडसे परिवारात येऊन समाजकार्यात सक्रिय झाल्या. त्यांचे पती अमोल गोडसे हेही सामाजिक व शेती क्षेत्रात कार्यरत आहेत.

**शिक्षण, संघटन आणि समाजकारण :** शालेय जीवनापासूनच वक्तृत्व आणि नेतृत्वाची आवड असलेल्या रेश्मा गोडसे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांनी प्रेरित होऊन भारतीय जनता पक्षात कार्य सुरू केले. गेल्या दहा वर्षांपासून त्यांनी पक्षाच्या विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत.

त्यांनी खालील पदांवर उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे —

भाजप कार्यकर्ता म्हणून सुरुवात. भाजप महिला तालुका अध्यक्ष. अकोले विधानसभा महिला अध्यक्ष. जिल्हा उपाध्यक्षा (अहिल्यानगर) या प्रवासात त्यांनी महिलांना संघटित करून राजकीय व सामाजिक क्षेत्रात पुढे आणले. "महिलांनी फक्त घरापुरते न राहता विकासनिर्मितीत भाग घ्यावा" हा त्यांचा ठाम संदेश आहे.

रेश्मा गोडसे यांनी आपल्या कार्यकाळात लहित गावासाठी तब्बल सहा कोटी रुपयांचा विकास निधी आणला आहे. गावाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी रस्ते, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, समाजमंदिर आणि इतर कामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला.

त्यातील एक विशेष उल्लेखनीय काम म्हणजे दशक्रिया विधीसाठी शेड बांधकाम. लहित खुर्द ग्रामस्थांची जुनी मागणी पूर्ण करताना त्यांनी खासदार माननीय सदाशिव लोखंडे साहेब यांच्याकडे प्रस्ताव मांडून, वारंवार पाठपुरावा करून अखेरीस १० लाख रुपयांचा निधी मंजूर करून काम पूर्णत्वास नेले.

रेश्मा गोडसे यांची विशेष ताकद म्हणजे त्यांची प्रशासकीय प्रणालीवरील सखोल समज आणि कार्यक्षम समन्वय क्षमता. त्यांनी महसूल, पंचायत राज आणि जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत अनेक प्रलंबित प्रस्तावांना गती दिली.

फाईल पुढे नेणे, मंजुरी मिळवणे, निधी वितरित करणे या सर्व प्रक्रियांमध्ये त्यांची पकड आणि संयम दिसून येतो. अनेक ग्रामस्थ आणि अधिकारी त्यांना "काम पूर्ण करून दाखवणारे नेतृत्व" म्हणून ओळखतात.

रेश्मा गोडसे यांनी मराठा आरक्षण आंदोलनातही अग्रभागी भूमिका निभावली. मराठा समाजाच्या न्याय्य मागणीसाठी त्यांनी महिलांसह शांततेत परंतु ठामपणे आंदोलन केले.

त्यांनी अनेक ठिकाणी मोर्चांमध्ये सहभाग घेतला आणि आरक्षणासाठी सरकारसमोर ठोस भूमिका मांडली.

रेश्मा गोडसे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत लहित खुर्द ग्रामस्थांच्या वतीने त्यांना "अहिल्या होळकर पुरस्कार" देण्यात आला.

तसेच त्या लिंगदेव शालेय समितीच्या अध्यक्ष म्हणून कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत.

त्यांना धार्मिक आणि देवनाम कार्यक्रमांचीही आवड असून समाजातील परंपरा, संस्कृती आणि एकोपा जपण्याचे कार्य त्या निष्ठेने करतात.

अकोले पंचायत समिती निवडणूक 2025 मध्ये ब्राम्हणवाडा गणातून इच्छुक उमेदवार म्हणून रेश्मा गोडसे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## प्रभावी राजकीय संबंध

रेश्मा गोडसे यांचे पिचड परिवार, विखे परिवार तसेच राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महसूल मंत्री यांच्याशी स्नेहसंबंध असून, विविध विकास योजनांच्या पाठपुराव्यात त्या नेहमी सक्रिय असतात. त्यांच्या या संबंधांचा लाभ लहित आणि आसपासच्या गावांच्या विकासाला मिळत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

